मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

निबंध - ८६ सन - १८९४

ले. शंकर रामचंद्र हतवळणे.

मुकभाषा अथवा हिंदुस्था-नात

( श्री प्रिंटर्स अॅण्ड स्टेशनर्स, ठाणे )

८६

अ.क्र. ८२२

एकभाषा अथवा हिंदुस्थानांत एक भाषा होईल किंवा नाहीं, आणि [illegible] कोणती ह्याविषयी विचार.

निबंध

ठा. नि. ४३४

Presented to the Grantha Sangrahalaya Thana.

Thana
1st Nov. 1895

[signature]

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणें.

सं.नि. ४३४

# एकभाषा

अथवा

## हिंदुस्थानांत एक भाषा होईल किंवा नाहीं, झाल्यास कोणती ह्याविषयीं विचार.

हें पुस्तक

रा. रा. शंकर रामचंद्र हतवळणे

ह्यांनीं तयार करून

तें

पुणे येथें सत्यप्रकाश छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

हें पुस्तक सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदलें आहे.

सन १८९४.

किंमत ०४. ट. ह. ००६

स्वकत


# प्रस्तावना.

हिंदुस्थानांत एक भाषा असावी, असें पुष्कळ लोकांस वाटूं लागलें आहे; परंतु एक भाषा होईल किंवा नाहीं, झाल्यास कोणती, ह्याविषयीं बराच मतभेद आहे. ह्या विषयाचे संबंधानें विचार करण्यास कांहीं साधन असावें ह्मणून हें लहानसें पुस्तक तयार केलें आहे. ह्या पुस्तकांत जी माहिती दिली आहे तीस सन १८९१ सालचे खानेसुमारीचा रिपोर्ट जो नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्याचा मुख्यत्वें आधार आहे. हिंदुस्थानांत कोणकोणत्या भाषा आहेत, त्या बोलणारे किती किती आहेत, त्यांचा प्रसार कोठकोठें कसा आहे वगैरे गोष्टींविषयीं ह्या पुस्तकांत माहिती दिली आहे. हिंदुस्थानांत एक भाषा होईल किंवा नाहीं ह्या प्रश्नाचे संबंधानें हल्लीं उद्योग चालू आहे, त्यास मदत करण्याचे हेतूनें हें पुस्तक तयार करण्याचें मनांत आलें.

धुळे.
तारीख २४ मार्च १८९४.  शं. रा. द.

नि
२२३८
मराठी ग्रंथ संग्रहालय नं. १६६ ठाणें सन १८९
सं. नं. ४३४

# एकभाषा.

## भाग १.

हिंदुस्थानांत आपणांस एक भाषा करावयाची आहे, तर हल्लीं कोणकोणत्या भाषा आहेत, त्यांचा प्रसार कोठकोठें आहे वगैरे गोष्टी समजणें अगत्याचें आहे. जी माहिती आह्मी देणार आहों, ती सन १८९१ सालीं म्हणजे नुकतीच जी खानेसुमारी झाली तिजवरून होय. प्रकृत विषयाला जितकी माहिती पाहिजे तितकी जरी ह्या खानेसुमारीवरून उपलब्ध नाहीं, तरी भाषांचे संबंधानें काय स्थिति आहे, हे साधारणपणें कळून येईल. ही माहिती देण्यापूर्वी कांहीं गोष्टींविषयीं खुलासा करणें जरूर आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या २८,७२,००,००० आहे. ही ब्रम्हदेश धरून आहे. २८,७२,००,००० लोक सांगितले, त्या सर्वांच्या भाषा समजल्या नाहींत. ह्यांपैकीं २६,२०,००,००० लोकांच्या भाषांची गणती झाली असून बाकी सुमारें २,५२,००,००० लोकांच्या भाषेची गणती झाली नाहीं. काश्मिर, राजपुताना, मध्यहिंदुस्थान, विजगापट्टन व चितेगांग डोंगर ह्या ठिकाणीं राहणारे लोक २,५२,००,००० आहेत, व त्यांविषयीं माहिती न मिळाल्यामुळें ते वगळलेले आहेत असें समजावें. ब्रम्हदेशाचे अपर ( वरचा ) व लोअर ( खालचा ) असे दोन भाग आहेत. हा देश हिंदुस्थानचा भाग नाहीं; म्हणून लोअर ब्रम्हदेशाचे ४६,५८,००० व अपर ब्रह्मदेशाचे २९,४७,००० असे ७६,००,००० लोक वगळणें जरूर आहे. ह्याशिवाय एडन, केटा वगैरे ठिकाणचे

१ ब्रह्मदेशाची माहिती निराळी दिली आहे.

लोक वगळले पाहिजेत; परंतु ते वगळले काय आणि न वगळले काय सारखेंच आहे. तेव्हां हिंदुस्थान देशांतील लोकांचे भाषांविषयीं विचार करावयाचा म्हणजे २९,४९,००,००० लोकांच्या भाषांविषयीं विचार करणें होय. आमची सरहद्द वायव्येकडे व पूर्वेकडे दिवसेंदिवस अधिक अधिक वाढत चालली आहे. ती कोठपर्यंत वाढत जाईल हें आज निश्चयानें सांगतां येत नाहीं; म्हणून त्या प्रदेशांविषयींचा विचार तूर्त तहकूब ठेवूं. दुसरी गोष्ट सांगावयाची ती ही कीं, उत्तर हिंदुस्थानांत हिंदी व उर्दू ह्यांमधील भेद पूर्णपणें दाखविणें शक्य नाहीं. हा भेद इतर ठिकाणीं समजून येतो. म्हणून उर्दू ही संज्ञा इतर ठिकाणचे मुसलमान लोकांनीं आपली स्वभाषा म्हणून जी भाषा सांगितली तीस लागू आहे. तिसरी गोष्ट ही कीं, निरनिराळे लोक आपआपले घरीं जी भाषा वापरतात, म्हणजे जी त्यांची स्वभाषा आहे तिजसंबंधानें पुढील माहिति आहे.

| नंबर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| १ | हिंदी. | ८,९६,७९,००० |
| २ | बंगाली. | ४,१३,४४,००० |
| ३ | तेलगू. | १,९८,८९,००० |
| ४ | मराठी. | १,८८,९३,००० |
| ५ | पंजाबी. | १,७७,२९,००० |
| ६ | टामिल. | १,५२,३०,००० |
| ७ | गुजराथी. | १,०६,२०,००० |
| ८ | कानडी. | ९७,५२,००० |
| ९ | उरिय. | ९०,११,००० |

२ हिंदुस्थानचा खानेसुमारीचा रिपोर्ट ( इंपिरिअल सेनसस रिपोर्ट ) पहा.

| नंबर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| १० | मल्यालम. | ५४,२८,००० |
| ११ | उर्दू. | ३६,६९,००० |
| १२ | सिंधी. | २५,९२,००० |
| १३ | संथाली. | १७,१०,००० |
| १४ | पहारी ( पश्चिम. ) | १५,२३,००० |
| १५ | असामी. | १४,३६,००० |
| १६ | गोंड. | १३,८०,००० |
| १७ | पहारी ( मध्य. ) | ११,५३,००० |
| १८ | मारवाडी. | ११,४७,००० |
| १९ | पष्टू. | १०,८१,००० |
| २० | कोल ( मुंडा. ) | ६,५४,००० |
| २१ | टुलू. | ४,९२,००० |
| २२ | कच्छी. | ४,४०,००० |
| २३ | जिप्सी पोटभाषा. | ४,०१,००० |
| २४ | ओरेआन. | ३,६८,००० |
| २५ | खोंड. | ३,२०,००० |
| २६ | इंग्रजी. | २,३८,००० |
| २७ | बलोच. | २,१९,००० |
| २८ | कचारी. | १,९९,००० |
| २९ | निपाली पोटभाषा. | १,९६,००० |
| ३० | कोरवा. | १,८६,००० |
| ३१ | खासी. | १,७९,००० |
| ३२ | भिल. | १,४८,००० |
| ३३ | गारो. | १,४५,००० |
| ३४ | हलबी. | १,४४,००० |
| ३५ | टिपरा. | १,२२,००० |

| नंबर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| ३६ | नाग पोटभाषा. | १,०३,००० |
| ३७ | सावर. | १,०२,००० |
| ३८ | मेच. | ९१,००० |
| ३९ | मिकिर. | ९०,००० |
| ४० | मणिपुरी. | ७४,००० |
| ४१ | खरिया. | ६८,००० |
| ४२ | अरबी. | ५३,००० |
| ४३ | बैग. | ४९,००० |
| ४४ | लुशाई. | ४२,००० |
| ४५ | लालंग. | ४०,००० |
| ४६ | गोआनी. | ३८,००० |
| ४७ | कुर्गी ( कोरगू. ) | ३७,००० |
| ४८ | अबॉरमिरी. | ३६,००० |
| ४९ | मलपहाडिया. | ३१,००० |
| ५० | गडब. | ३०,००० |
| ५१ | काश्मिरी. | २९,००० |
| ५२ | ब्रहूही. | २९,००० |
| ५३ | फारशी. | २८,००० |
| ५४ | पहारी ( पूर्व. ) | २४,००० |
| ५५ | तिबेटन ( भोती. ) | २१,००० |
| ५६ | कुकी. | १९,००० |
| ५७ | जुआंग व मलेर. | १२,००० |
| ५८ | लेपच. | १०,००० |
| ५९ | नीग्रो पोटभाषा. | ९,६०० |
| ६० | भूतानी. | ९,५०० |
| ६१ | कनावरी. | ९,३०० |

| नंबर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| ६२ | कोच. | ८,१०० |
| ६३ | खरवार. | ७,६०० |
| ६४ | सिंगफो. | ५,७०० |
| ६५ | किरकोळ बोडो पोटभाषा | ४,३०० |
| ६६ | माल्ह. | ३,२०० |
| ६७ | खामटी. | २,९०० |
| ६८ | चिनी. | २,५०० |
| ६९ | जर्मन. | २,२०० |
| ७० | फ्रेंच. | २,००० |
| ७१ | तोडवकोट. | १,९०० |
| ७२ | कखिइन. | १,९०० |
| ७३ | हीब्रू. | १,६५० |
| ७४ | आकमिश्मि वगैरे. | १,३०० |
| ७५ | शान. | ६४० |
| ७६ | पखिआल. | ६२५ |
| ७७ | टर्की. | ६१० |
| ७८ | अरमिनियन. | ५३० |
| ७९ | इटालियन. | ५३० |
| ८० | ग्रीक. | ३८० |
| ८१ | संस्कृत. | ३१० |
| ८२ | आयरिश. | ३०० |
| ८३ | ग्याळीक. | २६४ |
| ८४ | वेल्श. | २४५ |
| ८५ | माले. | २०० |
| ८६ | सिंहली | १९० |
| ८७ | स्पानिश. | १६० |
| ८८ | स्वीडिश. | १२० |

| नंबर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| ८९ | डच. | १२० |
| ९० | डयानिश. | ९४ |
| ९१ | नारवेजन. | ७९ |
| ९२ | रशियन. | ७४ |
| ९३ | जपानी. | ५१ |
| ९४ | बलगेरिअन. | ४९ |
| ९५ | पोलिश. | ४६ |
| ९६ | मग्यार. | ४२ |
| ९७ | माल्टी. | ३२ |
| ९८ | रुमानियन. | २२ |
| ९९ | फ्लेमिश. | २२ |
| १०० | जव्हानी. | १९ |
| १०१ | सिरिआक. | १२ |
| १०२ | चित्राली. | ११ |
| १०३ | शीन. | ६ |
| १०४ | फीन. | ५ |
| १०५ | सयामी. | ४ |
| १०६ | ऐटन. | २ |
| १०७ | सेलटिक. | २ |
| १०८ | स्लव्होनिक. | १ |
| १०९ | बोहेमियन. | १ |
| ११० | बस्क. | १ |
| १११ | ल्याटिन. | १ |
| ११२ | झेच. | १ |
| ११३ | बरमी. | १ |
| ११४ | पतनुली. | १८०० |
| ११५ | जतकी. | ७७,००० |
| | | १९,००,००० |

वर ज्या ११९ भाषा सांगितल्या तेव्हढ्याच भाषा आहेत असें निश्चयानें सांगण्यास चांगलें साधन नाहीं. खानेसुमारीच्या रिपोर्टांत ११९ भाषांची टीप दिली आहे. परंतु निरनिराळ्या प्रांतांखालीं भाषांची जी टीप दिली आहे तिचा व पहिल्या टिपेचा मेळ दिसत नाहीं. कदाचित् असें असेल कीं, वरील यादींत जिप्सी पोटभाषा, निग्रो पोटभाषा, निपाली पोटभाषा असें सांगितलें आहे. त्या पोटभाषा कोणत्या हें सांगितलें नाहीं. त्या पोटभाषा कोणत्या आहेत ह्याविषयीं प्रांतांखालीं येणाऱ्या भाषा सांगतांना उल्लेख केला असेल. जर असें नसेल तर गणती करतांना कदाचित् चूक झाली असेल. ज्या भाषा मुख्य टिपेंत दिसत नसून प्रांताखालीं दाखल केलेल्या आढळून येतात त्याः—

१ कमारी=३७०० ( मध्य प्रांत )
२ कोलेरियन पोटभाषा=७०० ( मध्यप्रांत )
३ लहानसहान द्रविड पोटभाषा=४१९ ( मध्यप्रांत )
४ बडग=३०६०० ( मद्रास इलाखा )
५ कुरुंबर=८०००( मद्रास ५२००; कुर्ग--२८०० )
६ कावेगर=१९०० ( मद्रास इलाखा )
७ येरव २६०० ( कुर्ग )
८ गुरकाली=८७०० ( पंजाब )
९ डोग्री=६४०० ( पंजाब )
१० मिरी=३६०० ( असाम )
११ मुरमी=२०६०० ( बंगाल )
१२ तिवारी=९२०० ( बंगाल )
१३ सुनुवार=४२०० ( बंगाल )
१४ डफला=१३०० ( असाम )

वरील मुद्याविषयीं निश्चय होईपर्यंत हिंदुस्थानांत ११९ भाषा आहेत असें घेऊन चालू.

वरील हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, हिंदुस्थानांत लहान मोठ्या सुमारें ११९ भाषा आहेत. ही संख्या दिसण्याला मोठी दिसते; परंतु वस्तुतः पाहतां ह्यांत विशेष नाहीं. कित्येक भाषा उगीच नांवाला आहेत. कित्येक लोकांनीं हिंदुस्थानांतील भाषांच्या संबंधानें उगीच बाऊ करून ठेविला आहे. नुसत्या संख्येवरून जर हिंदुस्थानांतील भाषांविषयीं विचार करावयाचा, तर इंग्लंडाविषयीं तोच विचार करावयास नको का? जर नुसत्या संख्येवरून विचार करावयाचा आहे, तर इंग्लंडांतही अनेक भाषांचे लोक आहेत. ज्यांची स्वभाषा जर्मन, फ्रेंच, इटालियन, मराठी, बंगाली अथवा गुजराथी आहे, असें अनेक प्रकारचे लोक रोजगार धंद्याच्या संबंधानें किंवा कामकाज संबंधानें दृष्टीस पडतात; म्हणून इंग्लंडांत फार भाषा आहेत हें ह्मणणें जितकें शोभेल, तितकेंच तें हिंदुस्थानचे संबंधानें शोभेल. ह्यावरून इंग्लंडांत जितक्या भाषा आहेत तितक्याच हिंदुस्थानांत आहेत, किंवा हिंदुस्थानांत भाषा प्रश्न फारसा अवघड नाहीं, असें आम्ही म्हणत आहों, असें कोणी समजूं नये. हिंदुस्थानांत निरनिराळ्या भाषा बऱ्याच आहेत व भाषा प्रश्न बराच अवघड आहे, ह्या गोष्टीबद्दल वाद नाहीं. जी गोष्ट ह्या ठिकाणीं विशेषेंकरून सांगावयाची ती ही कीं, जी वस्तुस्थिति आहे तिजपेक्षां अतिशयोक्तीचा भाग विशेष दृष्टीस पडतो. आतां खरी स्थिति काय आहे, ती आपण पाहूं.

हिंदुस्थानांतील भाषांविषयीं विचार करावयाचा ह्मणजे २९,४९,००,००० लोकांचे भाषांविषयीं विचार करावयाचा, असें आम्हीं वर सांगितलें आहे. ह्या लोकांचे भाषांविषयीं विचार करितां खालीं लिहिल्याप्रमाणें स्थिति दृष्टीस पडते. भाषांचे संबंधानें जी गणती झाली आहे तिजविषयीं विचार करितां हिंदी ज्यांची स्वभाषा आहे

असे शेंकडा सुमारें ३४, बंगाली १६, तेलगू ८, मराठी ८, पंजाबी ७, टामिल ६, गुजराथी ४, कानडी ४, उरिय ४, मल्यालम २, उर्दू १, व सिंधी १ आहेत.

हिंदीचा नंबर पहिला असून बंगाली, तेलगू, मराठी, पंजाबी, टामिल व गुजराथी ह्यांचा नंबर अनुक्रमें दुसरा, तिसरा, चवथा, पांचवा, सहावा व सातवा आहे. ह्या भाषांपैकीं प्रत्येक भाषेचे लोक एक कोटीपेक्षां अधिक आहेत. कानडी, उरिय व मल्यालम ह्या भाषा बोलणारे पन्नास लाखांपेक्षां व उर्दू व सिंधी ह्या भाषा बोलणारे पंचवीस लाखांपेक्षां जास्त आहेत. तेव्हां शेंकडा १ असें प्रमाण धरिलें, तर १२ भाषा आहेत, व ह्याच भाषा मुख्य आहेत. इंग्रजीशिवाय हिंदुस्थानांत ज्या भाषांचे द्वारें सरकार शिक्षण देतें व ज्या कोर्टाच्या भाषा समजतें, त्या मुख्यत्वें ह्याच भाषा होत. संस्थानिकही ह्या भाषांचे द्वारें शिक्षण देतात व ह्याच भाषा दरबारच्या भाषा समजतात. ११९ भाषा बोलणारे लोकांची संख्या २९,४९,००००० आहे. ह्यांपैकीं वर सांगितलेल्या १२ भाषा बोलणारे २३,९८,००००० ह्मणजे शेंकडा ९९ आहेत, व बाकींच्या १०३ भाषा बोलणारे शेंकडा ९ आहेत. ह्या १०३ भाषांत इंग्रजीचाही समावेश केला आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शेंकडा ९९ जो सांगितला तो ज्यांच्या त्या स्वभाषा आहेत त्यांचा आहे. ह्या भाषांपैकीं निदान एक तरी समजणारे शेंकडा ९ पैकीं कांहीं तरी लोक असले पाहिजेत. ह्या भाषांचे द्वारें बहुतेक ठिकाणीं व्यवहार चालत असल्यामुळें ह्या समजणें अगत्याचें आहे; म्हणून त्या समजणारे शेंकडा दोन तरी सांपडतील, असें आम्हांस वाटतें. ह्या हकीकतीवरून असें लक्षांत येईल कीं, हिंदुस्थानांत एक भाषा करण्याचा विचार करावयाचा ह्मणजे, ह्या १२ भाषांविषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा होय. ही गोष्ट लक्षांत न ठेवितां हिंदु-

स्थानचे भाषांविषयीं कांहीं लोक बाऊ करून ठेवतात त्याविषयीं आश्चर्य वाटतें.

आतां वर सांगितलेल्या १२ भाषांविषयींचा विचार एकीकडे ठेवून इतर भाषांच्या संबंधानें काय स्थिति दृष्टीस पडते ती पाहूं. इतर भाषांविषयीं विचार करितां त्यांपैकीं कांहीं भाषा बोलणारे निवळ उपरी आहेत. जर्मन, अरामिनियन, इटालियन, ग्रीक, ग्यालिक, स्वीडिश, स्पानिश, डच, रशिअन, जपानी, बल्गेरियन, पोलिश, रूमानियन, फ्लेमिश, जव्हानी, फिन, बोहेमियन वगैरे कांहीं भाषा बोलणारे हे उद्योग धंद्याचे संबंधानें किंवा अशाच प्रकारचे दुसरे कारणाकरितां येऊन राहिले आहेत. ते आज आहेत, उद्यां नाहींत, अशी त्यांपैकीं बहुतेकांची स्थिति आहे. असे लोक इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे सुधारलेल्या देशांत कमजास्त मानानें आहेत. बाकींच्या भाषांपैकीं कांहीं भाषा वर सांगितलेल्या १२ भाषांच्या पोटभाषा आहेत. ह्याशिवाय ज्या राहिल्या त्या जंगली लोकांच्या होत. त्यास लिपी नाहीं, व्याकरण नाहीं, किंवा कोणत्याही प्रकारचा नियम नाहीं. त्यांत शब्दसंग्रहही बेताचाच आहे. त्यांची ऊर्जितदशा करावयाची ह्मणजे, ज्या मुख्य भाषा सांगितल्या त्यांचीच मदत घ्यावयाची. एवंच, हिंदुस्थानांतील भाषांविषयींचा विचार हा मुख्य भाषांविषयींचा प्रश्न आहे. मुख्य भाषांशिवाय इतर भाषा १०३ आहेत असें सांगितलें आहे. ह्यांपैकीं इंग्रजी भाषा आपण एकीकडे ठेवूं. तिजविषयीं स्वतंत्र विचार करणें जरूर आहे. बाकी राहिलेल्या १०२ भाषांचे संबंधानें काय स्थिति दृष्टीस पडते ती पाहूं. पहिली गोष्ट जी दृष्टीस पडते तीही कीं, ह्यांपैकीं कोणतीही जरी एक भाषा घेतली, तरी ती बोलणारे २० लाखांपेक्षां जास्त नाहींत. ह्या भाषांचे संबंधानें जास्त खुलासा खालीं लिहिलेले कोष्टकावरून लक्षांत येईल.

संगती. ८३८

| लोकसंख्या | भाषांची संख्या. | भाषांचीं नांवें. |
|---|---|---|
| १ दहा व वीस लाख यांचे दरम्यानच्या | ८ | जतकी, संथाली, पहारी, ( पश्चिम ) असामी, गोंड, पहारी ( मध्य ), मारवाडी, व पश्तु. |
| २ पांच व दहा लाख यांचे दरम्यान | १ | कोल. |
| ३ दोन लाखांवर व पांच लाखांचे आंत | ६ | टुलु, कच्छी, जिप्सी पोटभाषा, ओरेआन, खोंड व बलोच. |
| ४ एक लाखापेक्षां जास्त व दोन लाखांपेक्षां कमी | १० | कचारी, निपाली पोटभाषा, कोरवा, खासी, भील, गारो, हलबी, टिपरा, नाग व सावर. |
| ५ पन्नास हजारांवर व लाखाचे आंत | ६ | मेच, मिकिर, मणिपुरी, पतनुली, खरिया व अरबी. |
| ६ पंचवीस हजारांच्यावर व पन्नास हजारांचे आंत | ११ | बैग, लुशई, लालंग, गोआनी, कुर्गी, ॲबॉरमिरी, मलपाहाडिया, गडब, काश्मिरी, ब्रहुही व फार्शी. |
| ७ दहा व पंचवीस हजार ह्यांचे दरम्यान | ५ | पहारी ( पूर्व ), टिबेटन (भोती ), कुकी, जुआंग, व मलेर व लेपच. |
| ८ पांच व दहा हजार ह्यांचे दरम्यान | ६ | निग्रो ( पोटभाषा ), भूतानी, कनावरी, कोच, खरवार व सिंगफो. |
| ९ एक हजारापेक्षां जास्त व पांच हजारापेक्षां कमी | ११ | किरकोळ बोडो पोटभाषा, माल्ह, खामटी, चिनी, बरमी, जर्मन, हिब्रू, फ्रेंच, तोडवकोट, आक, मिश्मि वगैरे, करिइन. |
| १० पांचशेंपेक्षां जास्त व हजाराचे आंत | ५ | अरमिनियन, इटालियन, पखिआल व टर्की. |

| लोकसंख्या. | भाषांची संख्या. | भाषांचीं नांवें. |
|---|---|---|
| ११ शंभरपेक्षां जास्त व पांचशेंपेक्षां कमी | १० | ग्रीक, संस्कृत, आयरिश, ग्यालिक, वेल्श, माले, स्वीडिश, सिंव्हली, स्पानिश व डच. |
| १२ शंभरापेक्षां कमी | २३ | रशियन, ड्यानिश, नारवेजन, जपानी, बलगेरियन, पोलिश, माग्यार, माल्टी, रूमानियन, फ्लेमिश, जव्हानी, सिरीआक, चित्राली, फिन, शीन, सयामी, ऐटान, सेलटिक, स्लवोनिक, बोहेमियन, बस्क, ल्याटिन व झेच. |

वरील कोष्टकावरून असें दिसून येईल कीं, १०२ भाषांपैकीं, ज्या भाषा बोलणारे दोन लाखांपेक्षां कमी आहेत अशा ८७, एक लाखापेक्षां कमी अशा ७७, पांच हजारांपेक्षां कमी अशा ४९, व एक हजारापेक्षां कमी अशा ३८ भाषा आहेत. २३ भाषा अशा आहेत कीं, त्यांपैकीं प्रत्येकी बोलणारे पुरे १०० देखील नाहींत. ह्यावरून हिंदुस्थानच्या भाषांविषयीं कांहीं लोकांनीं उगीच गैरसमज करून ठेविला आहे किंवा नाहीं हें लक्षांत येईल.

उर्दू भाषा वापरणारे बरेच आहेत, म्हणून तिची गणना मुख्य भाषांत केली आहे, परंतु खरोखर पाहतां ती हिंदीच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें कसें ह्याविषयीं स्वतंत्र विचार करूं.

मराठी ग्रंथ ... ठाणे.

# भाग २.

हिंदुस्थानांत एक भाषा करावयाची आहे, तर एकंदर भाषा किती आहेत, व त्यांचा प्रसार कोठकोठें आहे वगैरे गोष्टी समजणें जरूर आहे, असें आम्हीं मागील भागांत सांगितलें आहे, व त्याप्रमाणें पहिल्या गोष्टीविषयीं माहिती दिली आहे. निरनिराळ्या भाषांचा प्रसार कोठकोठें कसकसा आहे, ह्याविषयीं ह्या भागांत माहिती देण्याचा आमचा विचार आहे. जी माहिती आम्ही आतां देणार आहों, ती ज्या ज्या राजकीय विभागांखालीं जीं जीं संस्थानें मोडतात त्यांसुद्धां देत आहों असें समजावें. बडोदे, म्हैसूर वगैरे जीं संस्थानें, हिंदुस्थान सरकारच्या अमलाखालीं आहेत त्यांविषयीं स्वतंत्र माहिती दिली आहे. मुख्य भाषांविषयीं सविस्तर माहिती देणें इष्ट असल्यामुळें तसें करून इतर भाषांविषयीं जरूरी पुरती माहिती दिली आहे.

१ हिंदीः-ही भाषा ज्यांची स्वभाषा आहे असे. एकंदर ८,९६,७९,००० लोक आहेत. ह्यांची वांटणी येणें प्रमाणें.

| नंबर. | प्रांताचें नांव. | भाषा बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| १ | वायव्य प्रांत. | ३,३७,९८,००० |
| २ | बंगाल. | २,६६,९२,००० |
| ३ | अयोध्या. | १,२६,३६,००० |
| ४ | मध्यप्रांत. | ७२,७७,००० |
| ५ | पंजाब. | ४१,९८,००० |
| ६ | अजमीर मेरवारा. | ३,०७,००० |
| ७ | वऱ्हाड. | २,८०,००० |

| नंबर. | प्रांताचें नांव. | भाषा बोलणारांची संख्या. | |
|---|---|---|---|
| ८ | असाम. | २,३०,००० | |
| ९ | हैदराबाद. | ७८,००० | |
| १० | मुंबई. | २३,००० | ४२,००० |
| | सिंध. | १९,००० | |
| ११ | बडोदे. | १३,००० | |
| १२ | म्हैसूर. | ४,००० | |
| १३ | मद्रास. | ४४९ | |
| १४ | कुर्ग. | २३ | |

## ( २ ) बंगाली=४,१३,४४,०००.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बंगाल. | ३,८३,९१,००० | |
| २ | असाम. | २७,४२,००० | |
| ३ | वायव्यप्रांत. | २१,००० | |
| ४ | पंजाब. | २,३०० | |
| ५ | अयोध्या. | १,९०० | |
| ६ | मध्यप्रांत. | १,६०० | |
| ७ | मद्रास. | १,२०० | |
| ८ | मुंबई. | १,००० | १,०८६ |
| | सिंध. | ८६ | |
| ९ | अजमीर मेरवारा. | ३५० | |
| १० | म्हैसूर. | ६१ | |
| ११ | बडोदे. | ४३ | |
| १२ | हैदराबाद. | ३८ | |
| १३ | वऱ्हाड. | १४ | |
| १४ | कुर्ग. | ० | |

## ( ३ ) तेलगू=१,९८,८५,०००.

| नंबर. | प्रांताचें नांव. | भाषा बोलणारांची संख्या. | |
|---|---|---|---|
| १ | मद्रास. | १,३७,११,००० | |
| २ | हैद्राबाद. | ५०,३१,००० | |
| ३ | म्हैसूर. | ७,६२,००० | |
| ४ | मुंबई. व सिंध. | १,३५,६०० ; ६०० | १,३६,००० |
| ५ | मध्यप्रांत. | १,१७,००० | |
| ६ | वऱ्हाड. | ४३,००० | |
| ७ | बंगाल. | १६,००० | |
| ८ | कुर्ग. | ३,७०० | |
| ९ | असाम. | २,७०० | |
| १० | वायव्यप्रांत. | ७०० | |
| ११ | बडोदे. | ५०० | |
| १२ | अजमीर मेरवारा. | ५५ | |
| १३ | पंजाब. | २४ | |
| १४ | अयोध्या. | ३ | |

## ( ४ ) मराठी=१,८८,९३,०००.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुंबई. व सिंध. | १,०५,२०,००० ; ९,३०० | १,०५,२९,३०० |
| २ | हैद्राबाद. | ३४,९४,००० | |
| ३ | वऱ्हाड. | २३,०३,००० | |
| ४ | मध्यप्रांत. | २१,२८,००० | |
| ५ | मद्रास ( कोंकणी ) | २,८७,००० | |

| नंबर. | प्रांताचें नांव. | भाषा बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| ६ | म्हैसूर. | ६९,५०० |
| ७ | बडोदे. | ५१,८०० |
| ८ | वायव्य प्रांत. | ७,२०० |
| ९ | कुर्ग. | ४,८०० |
| १० | अजमीर मेरवारा. | १,६०० |
| ११ | बंगाल. | ९०० |
| १२ | पंजाब. | ५५० |
| १३ | अयोध्या. | २१६ |
| १४ | असाम. | ८५ |

## ( ५ ) पंजाबी=१,७७,२५,३००.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पंजाब. | १,७६,५५,००० | |
| २ | मुंबई. | ३,३०० | २६,००० |
| | सिंध. | २२,७०० | |
| ३ | वायव्य प्रांत. | ११,७०० | |
| ४ | बंगाल. | २,८०० | |
| ५ | हैदराबाद. | २,४०० | |
| ६ | अयोध्या. | १,३०० | |
| ७ | अजमीर मेरवारा. | १,२०० | |
| ८ | मध्यप्रांत. | १,२०० | |
| ९ | मद्रास. | ५०० | |
| १० | वऱ्हाड. | ३७० | |
| ११ | बडोदे. | २५५ | |
| १२ | असाम. | १६० | |
| १३ | म्हैसूर. | १८ | |
| १४ | कुर्ग. | ० | |

## ( ६ ) टामिल=१,५२,३०,०००.

| नंबर. | प्रांताचें नांव. | भाषा बोलणारांची संख्या | |
|---|---|---|---|
| १ | मद्रास. | १,४९,३१,००० | |
| २ | म्हैसूर. | १,५९,००० | |
| ३ | हैदराबाद. | २९,००० | |
| ४ | कुर्ग. | १९,००० | |
| ५ | मुंबई व | १३,५०० | २४,३०० |
| | सिंध. | ८०० | |
| ६ | बंगाल. | ६,००० | |
| ७ | मध्यप्रांत. | ६,००० | |
| ८ | वायव्यप्रांत. | ७०० | |
| ९ | वऱ्हाड. | ४०० | |
| १० | पंजाब. | ३०० | |
| ११ | अजमीर मेरवारा. | १३४ | |
| १२ | बडोदे. | ९५ | |
| १३ | असाम. | ३४ | |
| १४ | अयोध्या. | ० | |

## ( ७ ) गुजराथी=१,०६,२०,०००.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुंबई. व | ८१,३३,००० | ८२,०८,००० |
| | सिंध. | ७५,००० | |
| २ | बडोदे. | २२,४७,००० | |
| ३ | मद्रास ( पतनुली ) | ८३,००० | |
| ४ | हैदराबाद. | २७,००० | |

| नंबर. | प्रांताचें नांव. | भाषा बोलणारांची संख्या |
|---|---|---|
| ५ | वऱ्हाड. | २१,००० |
| ६ | मध्यप्रांत. | १७,००० |
| ७ | वायव्यप्रांत. | ५,००० |
| ८ | म्हैसूर. | २,२०० |
| ९ | बंगाल. | १,७०० |
| १० | अजमीर मेरवारा. | १,५०० |
| ११ | पंजाब. | १,५०० |
| १२ | कुर्ग. | १२६ |
| १३ | अयोध्या. | १०२ |
| १४ | असाम. | २६ |

## ( ८ ) कानडी=९७,५२,०००

| | | | |
|---|---|---|---|
| १ | म्हैसूर. | ३६,५६,००० | |
| २ | मुंबई. | ३०,६८,००० | } ३०,६८,०३६ |
| | व | | |
| | सिंध. | ३६ | |
| ३ | मद्रास. | १४,९३,००० | |
| ४ | हैदराबाद. | १४,५१,००० | |
| ५ | कुर्ग. | ७६,००० | |
| ६ | मध्यप्रांत. | ५,८०० | |
| ७ | वऱ्हाड. | १,१०० | |
| ८ | बडोदे. | १६९ | |
| ९ | पंजाब. | ३० | |
| १० | बंगाल. | १ | |

वायव्यप्रांत, अयोध्या, अजमीर मेरवारा, व असाम=०

## ( ९ ) उरिया = ९०,११,०००

| नंबर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| १ | बंगाल. | ६०,९९,००० |
| २ | मध्यप्रांत. | १६,०३,००० |
| ३ | मद्रास. | १२,९२,००० |
| ४ | असाम. | १२,००० |
| ५ | म्हैसूर. | ५७३ |
| ६ | वायव्यप्रांत. | २६५ |
| ७ | हैदराबाद. | १८० |
| ८ | मुंबई. व सिंध. | ७७ / ० } ७७ |
| ९ | अयोध्या. | १४ |
| १० | पंजाब. | ४ |
| ११ | अजमीर मेरवारा. | १ |

वऱ्हाड, बडोदे व कुर्ग = ०

## ( १०.) मल्यालम = ५४,२८,०००

| नंबर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| १ | मद्रास. | ५४,०९,००० |
| २ | कुर्ग. | १३,९०० |
| ३ | मुंबई. व सिंध. | १,४०० / ४ } १४०४ |
| ४ | म्हैसूर. | १,५०० |
| ५ | हैदराबाद. | १,२०० |
| ६ | बंगाल. | १०० |

| नंबर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| ७ | बडोदे. | ४४ |
| ८ | मध्यप्रांत. | १९ |
| ९ | वऱ्हाड. | ३ |
| १० | पंजाब. | २ |

असाम, वायव्यप्रांत, अजमीर मेरवारा व अयोध्या = ०

( ११ ) सिंधी २५,९२,०००

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सिंध. | २५,१२,००० | २५,६५,००० |
| | मुंबई. | ५३,००० | |
| २ | पंजाब. | २४,००० | |
| ३ | बडोदे. | १,००० | |
| ४ | वायव्यप्रांत. | २७० | |
| ५ | मद्रास. | ८० | |
| ६ | हैदराबाद. | ६२ | |
| ७ | म्हैसूर. | ४६ | |
| ८ | अयोध्या. | ९ | |
| ९ | मध्यप्रांत. | ९ | |
| १० | अजमीर मेरवारा. | ७ | |
| ११ | कुर्ग. | ५ | |
| १२ | बंगाल. | २ | |
| १३ | वऱ्हाड. | १ | |
| १४ | असाम. | ० | |

( १२ ) उर्दू ( मुसलमानी ) = ३६,६९,०००

| | | |
|---|---|---|
| १ | हैदराबाद. | ११,९८,००० |

| नंवर. | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. | |
|---|---|---|---|
| २ | मुंबई. | ११,९४,००० | ११,९४,००० |
| | व | | |
| | सिंध. | ० | |
| ३ | मद्रास. | ८,३९,००० | |
| ४ | म्हैसूर. | २,३९,००० | |
| ५ | मध्यप्रांत. | १,९८,००० | |
| ६ | बडोदे. | ८२,००० | |
| ७ | कुर्ग. | ६,९०० | |

वऱ्हाड, वायव्यप्रांत, अयोध्या, अजमीर मेरवारा, बंगाल, असाम व पंजाब = ०

( १३ ) **संथाली** = बंगाल. १६,९०,०००
( १७,०९,००० ) असाम. १९,०००

( १४ ) **काशमिरी** ( २९००० ) = पंजाब २८,४००
वायव्यप्रांत. २४०
बंगाल. १९०
मुंबई. १५०

(१५) **शीन** ( ६ ) पंजाब = ६
(१६) **चित्राली** (११) = पंजाब = ११
(१७) **पहारी** (पाश्चिम) = १५,२३,२०० पंजाब १५,२३,०००
वायव्यप्रांत १५०

(१८) **पहारी** (मध्य) ११,९३,२०० वायव्यप्रांत ११,९०,५००
अयोध्या २,७००

| | | | |
|---|---|---|---|
| (१९) पहारी ( पूर्व ) | २४,००० | वायव्यप्रांत | १८,००० |
| | | अयोध्या | १,००० |
| | | बंगाल. | ५,००० |
| (२०) कच्छी | ४,४०,००० | मुंबई | ४,२५,००० |
| | | बडोदे | १३,००० |
| | | मद्रास | १००० |
| | | व-हाड व मध्यप्रांत | ६०० |
| (२१) मारवाडी | ११, ४७,००० | | |
| | | १ पंजाब | ५,५४,००० |
| | | २ अजमीर मेरवारा | २,२९,००० |
| | | ३ सिंध | १,३८,००० |
| | | व | |
| | | मुंबई | १,३८००० |
| | | ४ व-हाड | ३६,००० |
| | | ५ मध्यप्रांत | २३,००० |
| | | ६ बंगाल | ७,००० |
| | | ७ असाम | ५,००० |
| | | ८ बडोदे | ५,००० |
| | | ९ वायव्यप्रांत | २,००० |
| | | १० मद्रास | १,१०० |
| | | ११ म्हैसूर | ६,०० |
| | | १२ अयोध्या | ३,०० |
| | | हैदराबाद व कुर्ग = | ० |
| (२२) गोआनी = | ३८,००० | मुंबई | २९,००० |
| | | सिंध | १७०० |
| | | मद्रास | ४,००० |
| | | वायव्यप्रांत | ५०० |

| | | | |
|---|---|---|---|
| (२३) हलबी = | १,४४,००० | मध्यप्रांत | १,४३,००० |
| | | मद्रास | ३०० |
| | | वऱ्हाड | ३०० |
| (२४) असामी | १४,३६,००० | असाम | १४,१४,००० |
| | | बंगाल | २१,००० |
| (२५) संस्कृत | ३०८ | मद्रास | १५१ |
| | | मुंबई | ७१ |
| | | हैदराबाद | ४६ |
| (२६) कोरगू | ३७,२०० | कुर्ग | ३५,३०० |
| | | मद्रास | १,००० |
| | | मुंबई | ९०० |
| (२७) तुळू | ४,९२,००० | मद्रास | ४,६४,००० |
| | | म्हैसूर | १४,३०० |
| | | कुर्ग | १२,००० |
| | | मुंबई | १,००० |
| (२८) तोड व कोट | १,९०० = | [मद्रास] | |
| (२९) सिंहली | १८७ | मद्रास | ७१ |
| | | म्हैसूर | ५० |
| (३०) माल्ह | ३,२०० | [मद्रास] | |
| (३१) गोंड | १३,८०,००० | मध्यप्रांत | ११,८८,००० |
| | | वऱ्हाड | ९५,००० |
| | | मद्रास | ५८,६०० |
| | | हैदराबाद | ३६,००० |
| (३२) खोंड | ३,२०,००० | मद्रास | १,९१,००० |
| | | मध्यप्रांत | ६६,००० |
| | | बंगाल | ६२,००० |
| | | असाम | १,३०० |
| (३३) ओरेआन | ३,६८,००० | बंगाल | ३,५४,००० |
| | | असाम | ९,६०० |
| | | मध्यप्रांत | ४,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| (३४) मलपहाडिया | ३१,००० | बंगाल | ३१,००० |
| (३५) ब्रहूई | २८,९९० | सिंध | २८,९८४ |
| | | मुंबई | ६ |
| (३६) खरवार | ७,६०० | मध्यप्रांत | ४,१०० |
| | | बंगाल | ३,५०० |
| (३७) कोळ (मुंडा) | ६,५४,००० | बंगाल | ५,७६,००० |
| | | असाम | २९,००० |
| | | मध्यप्रांत | ४९,००० |
| (३८) खरिया | ६७,८०० | बंगाल | ६०,००० |
| | | मध्यप्रांत | ७,००० |
| (३९) बैग | ४८,९०० | बंगाल | ४०,९०० |
| | | मध्यप्रांत | ८,००० |
| (४०) खोरवा | १,८५,८०० | मध्यप्रांत | ७५,००० |
| | | बंगाल | ६६,००० |
| | | वऱ्हाड | ३८,८०० |
| | | हैदराबाद | ५,७०० |
| (४१) भील | १,४८,००० | मुंबई | १,२५,००० |
| | | मध्यप्रांत | २१,७०० |
| (४२) सावर | १,०२,००० | मद्रास | १,०१,६०० |
| | | मध्यप्रांत | ४०० |
| (४३) गडब | २९,८०० | मद्रास | २९,४०० |
| | | मध्यप्रांत | ४०० |
| (४४) जुआंग | १२,००० | बंगाल | ११,२०० |
| | | मध्यप्रांत | ७०० |
| (४५) जिप्सी पोटभाषा | ४,०१,००० | हैदराबाद | १,५६,००० |
| | | वऱ्हाड | ७४,८०० |
| | | मद्रास | ६५,००० |
| | | म्हैसूर | ३२,००० |

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| | | मुंबई | ३०,००० |
| | | मध्यप्रांत | २९,००० |
| | | पंजाब | १२,५०० |
| ( ४६ ) खासी | १,७८,६०० | [ असाम ] | १,७८,६०० |
| ( ४७ ) भोती | २०,५०० | पंजाब | १७,६०० |
| | | बंगाल | १,६०० |
| | | वायव्यप्रांत | १,२०० |
| ( ४८ ) कनावरी | ९,३०० | पंजाब | ९,००० |
| ( ४९ ) निपाली | | | |
| पोटभाषा | १,९६,००० | बंगाल | १,७२,००० |
| | | असाम | १४,५०० |
| | | पंजाब | ८,७०० |
| ( ५० ) लेपच | १०,००० | बंगाल | १०,००० |
| ( ५१ ) भुतानी | ९,५०० | बंगाल | ८,२०० |
| | | असाम | १,३०० |
| ( ५२ ) कचारी | १,९९,००० | असाम | १,९७,००० |
| | | बंगाल | १,४०० |
| ( ५३ ) गारो | १,४५,००० | असाम | १,२०,००० |
| | | बंगाल | २५,००० |
| ( ५४ ) लालंग | ४०,००० | असाम | ४०,००० |
| ( ५५ ) कोच | ८,००० | बंगाल | ४,५०० |
| | | असाम | ३,५०० |
| ( ५६ ) मेचा | ९१,००० | असाम | ६९,००० |
| | | बंगाल | २२,००० |
| ( ५७ ) टिपरा | १,२२,००० | बंगाल | १,१४,००० |
| | | असाम | ८,००० |
| ( ५८ ) बोडो पोटभाषा | ४,३०० | [ असाम ] | |

| | | | |
|---|---|---|---|
| ( ५९ ) आबॉरमिरी | ३५,७०० | [ असाम ] | |
| ( ६० ) आक मिश्मि | १,२८२ | असाम | १,२७१ |
| | | बंगाल | ११ |
| ( ६१ ) नाग पोट० | १,०३,००० | असाम | १,०२,९०० |
| | | बंगाल | ५० |
| ( ६२ ) मिकिर | ९०,००० | [ असाम ] | ९०,००० |
| ( ६३ ) कखिइन | १,९०० | असाम | १,९०० |
| ( ६४ ) मणिपुरी | ७४,००० | असाम | ७२,३०० |
| ( ६५ ) कुकी | १८,८०० | [ असाम ] | |
| ( ६६ ) लुशई | ४१,८०० | असाम | ४१,८०० |
| ( ६७ ) शान | ६४० | असाम | ६४० |
| ( ६८ ) ऐटन | २ | [ असाम ] | |
| ( ६९ ) खामटी | २,९०० | [ असाम ] | |
| ( ७० ) फकिअल | ६२५ | [ असाम ] | |
| ( ७१ ) माले | २०० | मुंबई | २०० |
| ( ७२ ) जव्हानी | १९ | मुंबई | ११ |
| ( ७३ ) चिनी | २,५०० | बंगाल | १,००० |
| ( ७४ ) जपानी | ५१ | मुंबई | ३१ |
| ( ७५ ) फारशी | २८,००० | बंगाल | ८,००० |
| | | पंजाब | ७,४०० |
| | | मुंबई | ६,३०० |
| | | म्हैसूर | २,१०० |
| | | हैदराबाद | ८०० |
| | | वायव्यप्रांत | ४०० |
| | | मद्रास | २०० |
| | | मध्यप्रांत | ११० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( ७६ ) | अरमीनीयन | ५३० | बंगाल | ४२७ |
| ( ७७ ) | पष्टु | १०,८१,००० | पंजाब | १०,५८,००० |
| | | | सिंध | ९,३०० |
| | | | हैदराबाद | २,९०० |
| | | | मुंबई | ३,५०० |
| | | | बंगाल | १,२०० |
| | | | वऱ्हाड | १,००० |
| | | | वायव्यप्रांत | १,००० |
| | | | मध्यप्रांत | ६०० |
| ( ७८ ) | बलोच | २,१९,००० | सिंध | १,८०,००० |
| | | | पंजाब | ३५,५०० |
| | | | मुंबई | २,३०० |
| ( ७९ ) | हीब्रू | १,६५० | मुंबई | ५०० |
| | | | बंगाल | ४७० |
| | | | मद्रास | ४०० |
| ( ८० ) | अरबी | ५३,३०० | एडन | २४,००० |
| | | | हैद्राबाद | १३,००० |
| | | | मुंबई | ६,५०० |
| | | | बंगाल | ४,००० |
| | | | मद्रास | ४,००० |
| ( ८१ ) | सिरिआक | १२ | मुंबई ४; मद्रास | ६ |
| ( ८२ ) | टर्की | ६०७ | पंजाब २००; मुंबई २००; हैद्राबाद १०० | |
| ( ८३ ) | मग्यार | ४२ | मुंबई | १७ |
| ( ८४ ) | फिन | ५ | बंगाल | ५ |
| ( ८५ ) | इंग्रजी | २,३८,५०० | [ १ ] बंगाल | ३७,६०० |
| | | | [ २ ] मद्रास | ३८,७०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | [३] पंजाब | ३३,६०० |
| | | [४] मुंबई ३१,८०० व सिंध ५,००० | ३६,८०० |
| | | [५] वायव्यप्रांत | २९,४०० |
| | | [६] म्हैसूर | १०,००० |
| | | [७] हैद्राबाद | ९,००० |
| | | [८] अयोध्या | ७,२०० |
| | | [९] मध्यप्रांत | ७,१०० |
| | | [१०] असाम | २,००० |
| | | [११] अजमीर मेरवारा | १,४३० |
| | | [१२] वऱ्हाड | ६९० |
| | | [१३] कुर्ग | ४७९ |
| | | [१४] बडोदे | २६३ |
| ( ८६ ) जर्मन | २,२०० | बंगाल ६४०; मुंबई ४७० <br> मद्रास २९०; वायव्यप्रांत १०० | |
| ( ८७ ) डच | ११९ | मद्रास ४२; मुंबई २२ | |
| ( ८८ ) फ्लेमिश | २२ | पंजाब १२; बंगाल ५ | |
| ( ८९ ) डानिश | ९४ | मद्रास २७ <br> मुंबई १८ <br> बंगाल १६ | |
| ( ९० ) स्वीडिश | १२० | मुंबई ३७ <br> मध्यप्रांत २६ | |
| ( ९१ ) नारवेजन | ७५ | मद्रास ३३; बंगाल ३७ | |
| ( ९२ ) वेल्श | २४५ | पंजाब १७४; मुंबई २० <br> बंगाल १६; मद्रास १४ | |

| | | |
|---|---|---|
| ( ९३ ) आयरिश | ३०० | बंगाल ७०; वायव्यप्रांत ४९<br>मद्रास ९६; मध्यप्रांत ३२ |
| ( ९४ ) गेइलिक | २६४ | मुंबई २४२<br>सिंध १४ |
| ( ९५ ) सेलटिक | २ | मद्रास १<br>कुर्ग १ |
| ( ९६ ) ग्रीक | ३८० | बंगाल २००; मुंबई ६२<br>सिंध २१; मध्यप्रांत ७<br>मद्रास ६; पंजाब ५<br>वायव्यप्रांत ५; वऱ्हाड ४ |
| ( ९७ ) ल्याटिन | १ | [ बंगाल ] |
| ( ९८ ) इटालिअन | ५३० | मुंबई १९०; म्हैसूर ९०<br>बंगाल ६७; मद्रास ५८<br>हैद्राबाद १८; पंजाब २१<br>वा. प्रांत १६; बडोदे ८<br>मध्यप्रांत २ |
| ( ९९ ) माल्टी | ३२ | एडन २४; बंगाल ४<br>मुंबई २; मद्रास १ |
| (१००) रूमानिअन | २२ | बंगाल १०; मुंबई ५<br>वा. प्रांत २; मद्रास २ |
| (१०१) स्पानिश | १५९ | एडन ४९; मुंबई ३३<br>बंगाल २२; वा. प्रांत १५<br>मद्रास १९; पंजाब ८ |
| (१०२) फ्रेंच | २,१०० | बंगाल९००; मद्रास ६००<br>मुंबई १६६; वा. प्रांत ७०<br>म्हैसूर ६६; मध्यप्रांत ५५<br>पंजाब ४९; वऱ्हाड १४ |

| | | |
|---|---|---|
| | | सिंध ११; कुर्ग ८ |
| | | हैद्राबाद ८; बडोदे २ |
| (१०३) रशियन | ७४ | मुंबई ३६; बंगाल २५ |
| | | मद्रास ३; पंजाब १ |
| | | एडन ६ |
| (१०४) पोलिश | ४६ | मुंबई २२; पंजाब ११ |
| | | बंगाल ७; वायव्यप्रांत ३ |
| | | मद्रास १ |
| (१०५) झेच | १ | [ हैद्राबाद ] |
| (१०६) बलगेरिअन | ४९ | [ मुंबई ] |
| (१०७) स्लेव्होनिक | १ | [ बंगाल ] |
| (१०८) बस्क | १ | [ मद्रास ] |
| (१०९) नीग्रोपोटभाषा | ९,६०० | एडन ८,६००; सिंध ४६० |
| | | मुंबई ४००; हैद्राबाद ७५ |
| | | पंजाब ११; अयोध्या ९ |
| (११०) सिंगफो | ९,७०० | |
| (१११) सयामी | ४ | |
| (११२) बोहेमियन | १ | |
| (११३) बरमी | १,८०७ | मुंबई २०७; बंगाल ७३० |
| | | मद्रास ८७० |
| (११४) पतनुली | ७७,००० | मुंबई १,६००; मद्रास ७४,५०० |
| | | कुर्ग ७७० |
| (११५) जतकी | १९,००,००० | [ पंजाब ] |

वर जी हकीकत दिली तिजवरून आपणांस असें दिसून येतें कीं, हिंदी भाषेचा प्रसार मुख्यत्वें उत्तर हिंदुस्थानांत आहे. ह्या भागांतील वायव्यप्रांत, बंगाल व अयोध्या ह्यांत विशेष प्रसार असून पंजाब, असाम व सिंध ह्यांत त्यापेक्षां कमी आहे. हिंदीभाषा ज्यांची स्वभाषा आहे असे

८,५६,००,००० लोक आहेत. ह्यांपैकीं शेंकडा सुमारें ९० उत्तर हिंदुस्थानांत म्हणजे हिमाचल व विंध्याद्रि ह्यांचे दरम्यानचे प्रदेशांत आहेत. विंध्याद्रि व कृष्णा नदी ह्यांचे दरम्यान शेंकडा सव्वानऊ असून बाकी दक्षिण हिंदुस्थानांत आहेत. ह्यावरून हिंदीचा प्रसार उत्तरेकडून दक्षिणेकडे झाला आहे. उत्तरेस फार असून जों जों दक्षिणेकडे जावें, तों तों तो कमी कमी आहे.

हिंदी भाषेच्या खालोखाल बंगालीचा प्रसार आहे व तो मुख्यत्वें बंगाल्यांत आहे. ह्याचे खालोखाल असामांत आहे. बंगाल्यांत शेंकडा ९२ असून असामांत शेंकडा १$\frac{1}{2}$ आहे, व इतर सर्व प्रदेश मिळून शेंकडा ६$\frac{1}{2}$ आहे, म्हणजे इतर प्रदेशांत म्हणण्यासारखा प्रसार नाहीं.

बंगाली भाषा झाल्यावर तेलगूचा प्रसार बराच आहे असें दिसतें. हिचा प्रसार मुख्यत्वें मद्रास इलाखा व हैद्राबाद ह्यांत आहे. ही भाषा बोलणारे सुमारें २ कोट आहेत. त्यांपैकीं मद्रास इलाख्यांत शेंकडा ७२ असून हैद्राबादेंत म्हणजे निजामचे राज्यांत शेंकडा २५ आहेत. मुंबई इलाख्यांत शेंकडा $\frac{1}{2}$, मध्यप्रांतांत शेंकडा $\frac{1}{2}$ व बाकीचे इतर प्रदेश मिळून शेंकडा २ आहेत. ज्याप्रमाणें हिंदी भाषेचा प्रसार उत्तरेस फार व दक्षिणेस जावें तसतसा तो कमी दिसतो, त्याप्रमाणें तेलगूचा प्रसार दक्षिणेस फार व जों जों उत्तरेकडे जावें, तों तों कमी कमी दिसतो, परंतु हिंदी भाषेचा प्रवाह जसा बराच फैलावलेला आहे, तसा तेलगूचा दिसत नाहीं. हिंदुस्थानचे दोन विभाग उभे केले, तर उजवे बाजूस तेलगूचा प्रसार विशेष आहे व डावे बाजूस त्या मानानें बराच कमी आहे असें दिसतें. ह्यावरून तेलगु भाषा बोलणारे राजांचे राज्य दक्षिणेस कायमचे असून त्या राजांनीं हळूहळू उत्तरेस स्वाऱ्याकरून आपले राज्याची हद्द वाढविली असावी व त्यामुळें तेलगू लोक हळूहळू स्थाईक झाले असावेत असें दिसतें.

मराठी—मराठी बोलणारे सुमारें १,८९,००,००० लोक आहेत.

परंतु हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, मध्यहिंदुस्थानांतील संस्थानांतील लोकांचे भाषांचे संबंधानें गणती झाली नाहीं. ही झाली असती, तर मराठी बोलणारांची संख्या ह्याहून जास्त असती. शिंदे व होळकर यांचे राज्यांत हिंदी व मराठी अशा दोन मुख्य भाषा चालतात. तेव्हां ज्याप्रमाणें हिंदी भाषा बोलणारांत आणखी भर घालणें योग्य आहे, त्याप्रमाणें मराठी बोलणारांतही भर घातली पाहिजे; व असें केलें असतां मराठी ज्यांची स्वभाषा आहे असे लोक २ कोटींपेक्षां बहुधा जास्त सांपडतील. असो. तूर्त जी गणती झाली आहे तीच घेऊन चालूं. ह्या गणतीप्रमाणें मराठी बोलणारे १,८९,००,००० आहेत. ह्यांपैकीं सुमारें शेंकडा ५६ मुंबई इलाख्यांत, १८ निजामचे राज्यांत, १२ वऱ्हाडांत, ११ मध्यप्रांतात, १½ मद्रास इलाख्यांत व बाकीचे इतर ठिकाणीं आहेत. तेव्हां मराठीचा प्रसार मुख्यत्वें मुंबई इलाखा, निजामचें राज्य, वऱ्हाड, व मध्यप्रांत ह्यांत आहे. इतर ठिकाणीं म्हणण्यासारखा नाहीं. तथापि, हिंदीच्या खालोखाल बरीच फैलावलेली अशी मराठी भाषा आहे. बंगाली ही मराठीपेक्षां संख्येनें मोठी आहे; परंतु तिचा बहुतेक प्रसार बंगाल व आसाम ह्या दोन प्रातांत आहे. इतर ठिकाणीं तिचा प्रसार नांवाला मात्र आहे. तशी गोष्ट मराठीची नाहीं. दक्षिणेस म्हैसूर प्रांतीं व मद्रास इलाख्यांत साधारणपणें बरेच मराठी बोलणारे असून, उत्तरेस वायव्य प्रांतांतही कांहीं आढळून येतात. वायव्यप्रांतांत जे आढळून येतात ते ब्रह्मवर्त, काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रांचे ठिकाणीं जी इकडील मंडळी जाऊन राहिली, तिजमुळें मुख्यत्वें दृष्टीस पडत असावेत. बंगाल, पंजाब, व अयोध्या ह्या ठिकाणीं म्हणण्यासारखे मराठी बोलणारे नाहींत. तात्पर्य, मराठीचा विशेष फैलाव कर्कवृत्ताचे दक्षिणेस असून त्याचे उत्तरेस कमी आहे.

पंजाबी–पंजाबी बोलणारे एकंदर १,७६,५५,००० असून त्यां-

पैकीं सुमारें शेंकडा ९९½ पंजाबांत आहेत, व बाकीचे इतर प्रांतांत आहेत; म्हणजे इतर प्रांतांत कांहींच नाहींत असें ह्मटलें असतां चालेल.

टामिल—ही भाषा बोलणारे १,९२,३०,००० आहेत. ह्यांपैकीं शेंकडा ९८ मद्रास इलाख्यांत असून १ म्हैसूर प्रांतीं आहेत. बाकीचे इतर प्रांतांत आहेत. ज्याप्रमाणें पंजाबीचा फैलाव पंजाबाशिवाय इतर ठिकाणीं म्हणण्यासारखा नाहीं, त्याप्रमाणेंच टामिलचा फैलाव मद्रास इलाख्याशिवाय इतर ठिकाणीं नांव घेण्यासारखा नाहीं.

गुजराथी— गुजराथी भाषा बोलणारांची संख्या १,०६,२०,००० आहे. हिजपैकीं शेंकडा ७७ मुंबई इलाख्यांत व २१ बडोदे प्रांतीं आहे; ह्मणजे वस्तुतः ९८ मुंबई इलाख्यांत आहेत व बाकीचे इतर प्रांतांत आहेत. इतर प्रांतांत जे गुजराथी बोलणारे पसरलेले आहेत, त्यांपैकीं मद्रास इलाख्यांत बरेच असून त्याचे खालो-खाल हैदराबाद, वऱ्हाड व मध्यप्रांत ह्यांत आहेत. हिंदी व मराठी ह्या दोन भाषांचे प्रसारास राज्यकर्त्यांच्या त्या भाषा होत्या हें थोडेंसें कारण होतें. ही गोष्ट गुजराथीस लागू नाहीं. मद्रास, हैदराबाद, वऱ्हाड, मध्यप्रांत वगैरे ठिकाणीं गुजराथी लोकांचा जो कांहीं प्रसार दिसतो, तो ते लोक व्यापारी असल्यामुळें व्यापाराचे निमित्तानें त्यांचीं कुटुंबें वरील ठिकाणीं स्थाईक झालीं असावी हें कारण दिसतें.

कानडी—कानडी भाषा बोलणारे सुमारें ९७,९२,००० आहेत. त्यांपैकीं म्हैसूर प्रांतीं शेंकडा ३७, मुंबई इलाख्यांत ३१, मद्रास इला-ख्यांत १९, निजामच्या राज्यांत १९, व बाकी २ इतर ठिकाणीं आहेत. स्थूल दृष्टीनें पाहतां कानडीचा फैलाव कृष्णा व कावेरी ह्या दोन नद्यांचे दरम्यान जे प्रदेश आहेत त्यांत विशेष आहे; व कृष्णा नदीचे उत्तरेस व कावेरीच्या दक्षिणेस कमी आहे. मराठी, गुजराथी वगैरे भाषा बोलणारे बहुतेक सर्व प्रांतात कांहीं तरी आढळतात. परंतु कानडीची गोष्ट तशी नाहीं. वायव्यप्रांत, अयोध्या, अजमीरमेरवारा व

असाम ह्या ठिकाणीं, कानडी ज्यांची स्वभाषा आहे असा एकही मनुष्य नाहीं.

उरिया—ही भाषा बोलणारे ९०,११,००० आहेत. त्यांपैकीं शेंकडा ६८ बंगल्यांत, १७ मध्यप्रांतात, १४ मद्रास इलाख्यांत व बाकी राहिलेला १ इतर प्रांतांत आहे. सिंध, वऱ्हाड, बडोदे व कुर्ग ह्या प्रांतीं एकही नाहीं. एकंदरीनें विचार करितां ही भाषा बोलणारे हिंदुस्थानचे पूर्वेस मच्छलीपट्टनपासून कलकत्यापर्यंत जो तुकडा, त्यांत विशेष आहेत. हा तुकडा ह्मणजे, मद्रास इलाख्याचे उत्तरेस असलेला जैपुर प्रांत, बंगाल इलाख्याचे दक्षिणेस असलेला ओरिसा प्रांत व मध्यप्रांताच्या पूर्वेस असलेले संबलपूर व सोहनपूर हे प्रदेश होत.

मल्यालम—ही भाषा बोलणारांची संख्या ५४,२८,००० आहे. तिजपैकीं मद्रास इलाख्यांत शेंकडा ९९ वर आहेत. इतर ठिकाणीं ह्मणण्यासारखे नाहींत. ज्याप्रमाणें अजमीरमेरवारा, वायव्यप्रांत, अयोध्या व असाम ह्या प्रांतीं कानडीचा एकही मनुष्य नाहीं, त्याप्रमाणेंच मल्यालम ज्याची स्वभाषा आहे असा एकही ह्या चार प्रांतांत नाहीं. ह्यावरून ह्या भाषा बोलणारे इतर लोकांचे मानानें पहातां कमी धाडशी असावेत असें दिसतें. मल्यालम भाषा बोलणारे बहुतेक मद्रास इलख्यांत सांपडतात असें सांगितलें; परंतु ते सर्व इलाख्याभर पसरलेले नसून ह्यांचा विशेष भरणा ह्या इलाख्याचे पश्चिम प्रदेशांत आहे.

सिंधी—ही भाषा बोलणारे २५,९२,००० आहेत. त्यांपैकीं सुमारें ९९ फक्त सिंधप्रांतीं आहेत; व बाकीचे इतर ठिकाणीं आहेत. सिंधप्रांत सोडून मुंबई इलाख्याचे इतर भागांत व पंजाबांत थोडे आहेत. बाकी इतर ठिकाणीं कांहींच नाहींत असें ह्मटलें असतां चालले. असामांत तर एकही नाहीं.

उर्दू (मुसलमानी)—उत्तर हिंदुस्थान शिवाय इतर ठिकाणचे मुसलमान

लोकांनीं आपली स्वभाषा ह्मणून जी भाषा लिहून दिली आहे, तीस उर्दू ही संज्ञा आहे असे मागें सांगितलेंच आहे. ही भाषा ज्यांची स्वभाषा आहे, असे ३६,६९,००० लोक आहेत. त्यांपैकीं शेंकडा ३३ निजामचे राज्यांत, ३१ मुंबई इलाख्यांत, २३ मद्रास इलाख्यात, ६ म्हैसूर प्रांतीं, ४ मध्यप्रांत, २ बडोदे प्रांतांत, व २ कुर्ग प्रांतांत आहेत.

वर ज्या १२ भाषा सांगितल्या त्यांशिवाय इतर भाषांविषयींची माहिति तूर्त सांगण्याचें कारण नाहीं. त्यांचा प्रसार कोठकोठें किती आहे, हें वर दिलेल्या माहितींवरून कळेल.

---

## भाग ३.

हिंदुस्थानांत भाषा किती आहेत व ह्या भाषा कोठकोठें आहेत ह्याविषयीं येथवर विचार झाला. आतां मुंबई, मद्रास, बंगाल वगैरे जे हिंदुस्थानचे निरनिराळे विभाग आहेत, त्यांत कोणत्या भाषा आहेत व त्या बोलणारे किती आहेत ह्याविषयीं माहिति देऊं. ह्मणजे प्रत्येक विभागांत मुख्य भाषा कोणत्या व दुसऱ्या भाषा कोणत्या हें कळेल, व भाषाप्रश्न जो हल्लीं घोटाळ्याचा वाटतो तो तितका वाटणार नाहीं. हिंदुस्थानचे ज्या भागांविषयीं माहिति द्यावयाची तेः—

वायव्यप्रांत, अयोध्या, पंजाब, बंगाल, मद्रास, मुंबई, मध्यप्रांत, असाम, वऱ्हाड, बडोदे, हैदराबाद, कुर्ग, म्हैसूर व अजमीरमेरवारा. मध्याहिंदुस्थानांतील संस्थानांविषयीं माहिति मिळाली नाहीं, सबब ती दिली नाहीं. ब्रह्मदेश हा निराळा देश आहे, तेव्हां त्याविषयीं शेवटीं माहिति देऊं.

आतां एक भाषा करण्यास सुलभ पडावें ह्मणून ह्या प्रदेशांचे आम्ही ग्रुप ( गट ) केले आहेत ते ग्रुप असेः—पहिला वायव्यप्रांत, दुसरा पंजाब, तिसरा बंगाल, चौथा मध्य हिंदुस्थानांतील संस्थानें,

पांचवा मुंबई, सहावा मध्यप्रांत, सातवा हैदराबाद, व आठवा मद्रास. कोणत्या ग्रुपखालीं कोणते प्रदेश धरिले आहेत हे पुढील माहितीवरून समजेल.

१ ला ग्रुप ( वायव्यप्रांत )—ह्यांत वायव्यप्रांत सरकारचे ताब्यांतील मुलूख, ह्या सरकारचे ताब्यांतील संस्थानें व अयोध्याप्रांत ह्यांचा समावेश केला आहे.

२ रा ग्रुप ( पंजाब )—१ पंजाब सरकारचे अमलाखालील मुलूख, २ ह्या सरकारचे ताब्यांतील संस्थानें.

३ रा ग्रुप ( बंगाल )—१ बंगाल, २ संस्थानें, ३ असाम.

४ था ग्रुप ( मध्यहिंदुस्थान )—१ मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें, २ आगाऊया व कांटानमेंट यांचे हद्दींतील प्रदेश.

५ वा ग्रुप ( मुंबई )—१ मुंबई, २ संस्थानें, ३ सिंध, ४ खैरपूर, ५ बडोदे.

६ वा ग्रुप ( मध्यप्रांत )— १ मध्यप्रांत, २ संस्थानें, ३ वऱ्हाड.

७ वा ग्रुप ( हैदराबाद )— निजामचें राज्य.

८ वा ग्रुप ( मद्रास )— १ मद्रास, २ संस्थानें, ३ कुर्ग, ४ म्हैसूर.

वर जे ग्रुप सांगितले, ते त्या खालीं येणारे निरनिराळे प्रदेशांतलि भाषांचे कांहीं अंशीं साम्य व कांहीं अंशीं परस्परांचा निकट संबंध, ह्या गोष्टी लक्षांत आणून केले आहेत.

## ग्रुप नंबर १.—वायव्यप्रांत [ वायव्यप्रांत, संस्थानें व अयोध्या. ]

| नंबर. | भाषेचें नांव. | वायव्यप्रांत. | संस्थानें. | अयोध्या. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | हिंदी. | ३,३२,४७,००० | ५,५१,००० | १,२६,३६,००० | ४,६४,३४,००० |
| २ | पहारी ( कुमाओनी. ) | ५,०३,००० | ,, | २,७०० | ५,०५,७०० |
| ३ | पहारी ( गऱ्हवाली. ) | ४,०७,००० | २,४०,००० | ,, | ६,४७,००० |
| ४ | इंग्रजी. | २५,००० | ३० | ७,२०० | ३२,२३० |
| ५ | बंगाली. | २१,००० | ,, | १,८०० | २२,८०० |
| ६ | पहारी ( निपाली. ) | १८,००० | ,, | १,१०० | १९,१०० |
| ७ | पंजाबी. | ११,००० | ३०० | १,३०० | १२,६०० |
| ८ | मराठी. | ७,००० | ,, | २१० | ७,२१० |
| ९ | गुजराथी. | ५,००० | ,, | १०० | ५,१०० |
| १० | मारवाडी. | २,००० | ,, | ३१० | २,३१० |
| ११ | तिबेटन. | १,१०० | १०० | ,, | १,२०० |
| १२ | बरमी. | १,१०० | ,, | १६० | १,२६० |
| १३ | पष्टू. | १,००० | ,, | १०० | १,१०० |

| नंबर. | भाषेचें नांव. | वायव्यप्रांत. | संस्थानें. | अयोध्या. | एकंदर. |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १४ | तेलगू. | ७०० | ,, | ,, | ७०० |
| १५ | टामिल. | ६५० | ,, | ,, | ६५० |
| १६ | फारशी. | ४२० | ,, | ५० | ४७० |
| १७ | मणिपुरी. | ३७५ | ,, | ,, | ३७५ |
| १८ | सिंधी. | २७० | ,, | ,, | २७० |
| १९ | उरिय. | २६५ | ,, | ,, | २६५ |
| २० | काशमिरी. | २२५ | ,, | ५० | २७५ |
| २१ | चिनी. | २१७ | ,, | ,, | २१७ |
| २२ | पहारी [ पंजाबी ] | ८० | ,, | ,, | ८० |
| २३ | पहारी [ पश्चिम.] | ,, | ७२ | ,, | ७२ |
| २४ | कनावरी. | ,, | २३० | ,, | २३० |
|  | दुसऱ्या. | ४५० | ५५ | १०४ | ६०९ |
|  | दाखल न झालेल्या भाषा बोलणारे. | १० | ,, | ,, | १० |
|  | एकंदर. | ३,४२,५४,००० | ७,९२,००० | १,२६,५१,००० | ४,७७,०७,००० |

## ग्रुप नंबर २.--पंजाब [ पंजाब व संस्थानें. ]

| नंबर. | भाषा. | पंजाब. | संस्थानें. | एकंदर. |
|---|---|---|---|---|
| १ | पंजाबी. | १,३१,७३,००० | २५,७६,००० | १,५७,४९,००० |
| २ | हिंदी. | ३६,७९,००० | ४,७९,००० | ४१,५८,००० |
| ३ | जतकी. | १७,६०,००० | १,४०,००० | १९,००,००० |
| ४ | पष्टू. | १०,५६,००० | १५०० | १०,५७,५०० |
| ५ | पहारी [पश्चिम.] | ७,३८,००० | ७,८५,००० | १५,२३,००० |
| ६ | मारवाडी [ बाग्री. ] | ३,१४,००० | २,४०,००० | ५,५४,००० |
| ७ | बलोच. | ३४,००० | १,४०० | ३५,४०० |
| ८ | इंग्रजी. | ३३,४०० | २०० | ३३,६०० |
| ९ | काशामिरी. | २७,००० | १,३०० | २८,३०० |
| १० | तिबेटन. | १५,००० | २,४०० | १७,४०० |
| ११ | जिप्सी पोटभाषा. | १०,००० | २,१०० | १२,१०० |
| १२ | गुरकाली [ पोटभाषा. ] | ७,९०० | ८०० | ८,७०० |
| १३ | फारशी. | ७,३०० | १७० | ७,४७० |

| नंबर. | भाषा. | पंजाब. | संस्थानें. | एकंदर. |
|---|---|---|---|---|
| १४ | डोग्री. | ३,२०० | ३,२०० | ६,४०० |
| १५ | बंगाली. | २,२०० | १०० | २,३०० |
| १६ | सिंधी. | २,४०० | २१,६०० | २४,००० |
| १७ | गुजराथी. | १,४०० | ,, | १,४०० |
| १८ | मराठी. | ४४० | ११० | ५५० |
| १९ | टामिल. | ३४० | ,, | ३४० |
| २० | टर्की. | १९० | ,, | १९० |
| २१ | वेल्श. | १७५ | ,, | १७५ |
| २२ | गोआनी. | १४० | ,, | १४० |
| २३ | अरबी. | १०५ | ,, | १०५ |
| २४ | कनावरी. | ,, | ९,००० | ९,००० |
| २५ | चिनी. | ,, | १४० | १४० |
| | दुसऱ्या. | ३६२ | ५९ | ४२१ |
| | एकंदर. | २,०८,६७,००० | ४२,६३,००० | २,५१,३०,००० |

## ग्रुप नंबर ३—बंगाल [ बंगाल इलाखा, संस्थानें व असाम. ]

| नंबर. | भाषेचें नांव. | बंगाल. | संस्थानें. | असाम. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | बंगाली. | ३,७७,४०,००० | ६,५१,००० | २७,४२,००० | ४,१४,३३,००० |
| २ | हिंदी. | २,६१,४८,००० | ५०,५०० | २,३०,००० | २,६४,२८,५०० |
| ३ | उरिय. | ४६,०९,००० | १४,९०,००० | १२,००० | ६१,११,००० |
| ४ | संथाली. | १४,१८,००० | २,७२,००० | १९,२०० | १७,०९,२०० |
| ५ | असामी. | ६०० | २१,००० | १४,१४,००० | १४,३५,६०० |
| ६ | मुंडा. | ४,७१,००० | १,०५,००० | २९,००० | ६,०५,००० |
| ७ | ओरेआन. | ३,५४,००० | ,, | ९,६०० | ३,६३,६०० |
| ८ | कचारी. | १,४०० | ,, | १,९७,००० | १,९८,४०० |
| ९ | खासी. | ,, | ,, | १,७९,००० | १,७९,००० |
| १० | गारो. | २४,३०० | ७०० | १,२०,००० | १,४५,००० |
| ११ | टिपरा. | २,९०० | १,११,००० | ८,००० | १,२१,९०० |
| १२ | निपाली. | ९६,००० | २१,५०० | ,, | १,१७,५०० |
| १३ | नाग पोटभाषा. | ,, | ,, | १,०३,००० | १,०३,००० |

| नंबर. | भाषेचें नांव. | बंगाल. | संस्थानें. | असाम. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| १४ | मेच. | २१,६०० | " | ६९,००० | ९०,६०० |
| १५ | मिकिर. | " | " | ९०,००० | ९०,००० |
| १६ | मणिपुरी. | ६६० | " | ७२,००० | ७२,६६० |
| १७ | कोरवा. | ४०,२०० | २६,००० | " | ६६,२०० |
| १८ | खोंड. | ४६,६०० | १५,००० | १,३०० | ६२,९०० |
| १९ | खरिआ. | ३९,३०० | २०,६०० | १,००० | ६०,९०० |
| २० | लुशाई. | " | " | ४२,००० | ४२,००० |
| २१ | बैग. | ७०० | ४०,००० | " | ४०,७०० |
| २२ | लालुंग. | " | " | ४०,००० | ४०,००० |
| २३ | इंग्रजी. | ३७,५०० | ८० | २,१०० | ३९,६८० |
| २४ | मिरी. | " | " | ३६,००० | ३६,००० |
| २५ | मालपहाडिया. | ३०,००० | ८०० | " | ३०,८०० |
| २६ | मुरमी. | २०,६०० | " | " | २०,६०० |
| २७ | अराकनी. | २०,२०० | " | " | २०,२०० |
| २८ | तेलगू. | १३,१०० | ३,३०० | २,७०० | १९,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ | कुकी. | ,, | ,, | १८,९०० | १८,९०० |
| ३० | कि०निपाली पोटभाषा. | ६६० | ,, | १४,५०० | १५,१६० |
| ३१ | मारवाडी. | ७,००० | ,, | ५,५०० | १२,५०० |
| ३२ | लिंबू. | १२,४०० | ,, | ,, | १२,४०० |
| ३३ | मागर. | ११,३०० | ,, | ,, | ११,३०० |
| ३४ | जुआंग. | १२० | ११,००० | ,, | ११,१२० |
| ३५ | लेपच. | १०,१०० | ,, | ,, | १०,१०० |
| ३६ | भोतानी. | ८,००० | १३० | १,३०० | ९,४३० |
| ३७ | कोच. | ४,५०० | ,, | ३,६०० | ८,१०० |
| ३८ | फारशी. | ८,००० | ,, | १०८ | ८,१०८ |
| ३९ | टामिल. | ६,००० | ,, | ,, | ६,००० |
| ४० | निवारी. | ५,२०० | ,, | ,, | ५,२०० |
| ४१ | पहारी. | ५,००० | ,, | ,, | ५,००० |
| ४२ | लहानसहान बोडो पोटभाषा | ,, | ,, | ४,३०० | ४,३०० |
| ४३ | सुनुवार. | ४,२०० | ,, | ,, | ४,२०० |
| ४४ | अरबी. | ३,८०० | ,, | ,, | ३,८०० |
| ४५ | खरवार. | ३,४०० | ,, | ,, | ३,४०० |

| नंबर. | भाषेचें नांव. | बंगाल. | संस्थानें. | असाम. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | पंजाबी. | २,८०० | ,, | १६० | २,९६० |
| ४७ | खामटी. | ,, | ,, | २,९०० | २,९०० |
| ४८ | सिंगफो. | ,, | ,, | १,९०० | १,९०० |
| ४९ | गुजराथी. | १७०० | ,, | ,, | १,७०० |
| ५० | तिबेटन. | १६०० | ,, | ,, | १,६०० |
| ५१ | पष्टु. | १२०० | ,, | ३३० | १,५३० |
| ५२ | डफला. | ,, | ,, | १,३०० | १,३०० |
| ५३ | गोंड. | ८४० | २६५ | ,, | १,१०५ |
| ५४ | चिनी. | ९०० | ,, | ,, | ९०० |
| ५५ | फ्रेंच. | ९०० | ,, | ,, | ९०० |
| ५६ | मराठी. | ९०० | ,, | ,, | ९०० |
| ५७ | बरमी. | ६०० | १३० | ,, | ७३० |
| ५८ | जर्मन. | ६३५ | ,, | ,, | ६३५ |
| ५९ | शान. | ,, | ,, | ६४० | ६४० |
| ६० | फकिअल. | ,, | ,, | ६२५ | ६२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६१ | हीब्रू. | ४७० | ,, | ,, | ४७० |
| ६२ | अरमीनियन. | ४२९ | ,, | ,, | ४२९ |
| ६३ | ग्रीक. | २०० | ,, | ,, | २०० |
| ६४ | काशमिरी. | १९० | ,, | ,, | १९० |
| ६५ | कोरवा. | ,, | ,, | १८० | १८० |
| ६६ | गोआनी व पोर्चुगीज. | १७० | ,, | ,, | १७० |
| ६७ | दुसऱ्या. | ६४० | ४८० | ४०० | १,५२० |
| ६८ | ओळखतां येत नाहींत अशा | ३२ | ९ | ,, | ४१ |
| ६९ | दाखल नसलेल्या. | १,०७,००० | २५० | ,, | १,०७,२५० |
| | एकंदर. | ७,१३,४७,००० | ३२,९६,००० | ५४,७७,००० | ८,०१,२०,००० |

## ग्रुप नंबर ४—मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें, आगगाड्या, कांटानमेंट, अजमीर मेरवारा.

| नं०. | भाषेचें नांव. | राजपुतान्यांतील आगगाड्या व मध्यहिंदुस्थानांतील आगगाड्या व कांटानमेंट. | अजमीर मेरवारा. | एकंदर. |
|---|---|---|---|---|
| १ | हिंदी | ८३,५०० | ३,०७,००० | ३,९०,५०० |
| २ | मारवाडी | ८,१०० | २,२९,००० | २,३७,१०० |
| ३ | मराठी | ११,१०० | १,६०० | १२,७०० |
| ४ | इंग्रजी | ५,२०० | १,४०० | ६,६०० |
| ५ | गुजराथी | २,७०० | १,५०० | ४,२०० |
| ६ | पंजाबी | २,२०० | १,१५० | ३,३५० |
| ७ | भील | १,१६० | ,, | १,१६० |
| ८ | टामिल | ८२० | १३४ | ९५४ |
| ९ | तेलगू | ६२० | ५५ | ६७५ |
| १० | बंगाली | २१० | ३५२ | ५६२ |
| ११ | गोआनी | ३७५ | १३९ | ५१४ |
| १२ | पश्तू | १५८ | ८४ | २४२ |
| १३ | फारशी | ७० | ८८ | १५८ |
| १४ | अरबी | ५५ | ,, | ५५ |
| १५ | काशमिरी | ,, | ३५ | ३५ |
| १६ | जर्मन | ११ | ,, | ११ |
| १७ | दुसऱ्या | १५० | ५४ | २०४ |
| | एकंदर. | १,१६,४०० | ५,४२,६०० | ६,५९,००० |

## ग्रूप नंबर ५—मुंबईइलाखा, सिंध, संस्थानें, खैरपूर, व बडोदे.

| नं० | भाषेचें नांव. | मुंबई. | सिंध. | संस्थानें | खैरपूर | बडोदे | एकंदर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गुजराथी | ३३,२१,००० | ७५,००० | ३८,१०,००० | ,, | २२,४७,००० | १,०४,५३,००० |
| २ | मराठी | ८६,०४,००० | ९,३०० | १७,५९,००० | ,, | ५२,००० | १,०४,२४,३०० |
| ३ | कानडी | २४,९३,००० | ,, | ५,७५,००० | ,, | १७० | ३०,६८,१७० |
| ४ | सिंधी | ३,८०० | २३,८४,००० | ४९,००० | १,२८,५०० | १,००० | २५,६६,३०० |
| ५ | उर्दू | ९,००,००० | ,, | २,५४,३०० | ,, | ८२,००० | १२,३६,००० |
| ६ | कच्छी | ४९,००० | ,, | ३,७५,६०० | ,, | १२,९०० | ४,३७,५०० |
| ७ | मारवाडी | ९२,००० | १,३७,००० | ४,६७० | १,१०० | ४,८०० | २,३९,५०० |
| ८ | बलोच. | २७४ | १,७८,००० | २,०० | १,८०० | ४३५ | १,८२,५०९ |
| ९ | कोंकणी | १,४१,००० | ,, | १६,००० | ,, | ,, | १,५७,००० |
| १० | तलगू. | १,२१,००० | ७०० | १४,००० | ,, | ५०० | १,३६,२०० |
| ११ | भील | १,१४,००० | ,, | ११,६०० | ,, | ,, | १,२५,६०० |
| १२ | हिंदी | २२,५०० | १८,७०० | ६५० | ३० | १३,२०० | ५५,०८० |
| १३ | इंग्रजी | ३०,८०० | ५,००० | ५७० | ३ | २६३ | ३७,०३६ |

| नं० | भाषेचें नांव. | मुंबई. | सिंध. | संस्थानें. | खैरपूर. | बडोदे | एकंदर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | गोआनी व पोर्चुगिज. | २८,८०० | १,७०० | ५०० | ” | २१२ | ३१,२१२ |
| १५ | जिप्सी पो. भा. | २८,९०० | ” | १,३५० | ” | ” | ३०,२५० |
| १६ | ब्रहूई. | ” | २९,००० | ” | ” | ” | २९,००० |
| १७ | पंजाबी. | २,४०० | २१,७०० | ९१५ | ४६० | २५५ | २५,७३० |
| १८ | टामिल. | ११,००० | ८५० | २,५०० | ” | ९५ | १४,४४५ |
| १९ | पष्टू. | १,९०० | ९,३०० | १,६०० | ४५ | ७० | १२,९१५ |
| २० | अरबी. | ३,८०० | ५७० | २,७०० | ” | १८० | ७,२५० |
| २१ | फारशी. | ४,४०० | ७०० | १,९०० | ६ | १०० | ७,१०६ |
| २२ | मल्यालम. | १,७६० | ” | ” | ” | ” | १,७६० |
| २३ | पतनुली. | १,३०० | ” | ३०० | ” | ” | १,६०० |
| २४ | टुलू. | १,०६० | ” | ” | ” | ” | १,०६० |
| २५ | बंगाली. | ९०० | ८५ | ” | ” | ” | ९८५ |
| २६ | कोदगु. | ८७५ | ” | ” | ” | ” | ८७५ |
| २७ | नीग्रो पो. भा. | ३७९ | ४६० | ” | ” | ” | ८३९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ हीब्रू. | ५०० | ,, | ,, | ,, | ,, | ५०० |
| २९ चिनी. | २४४ | २५० | ,, | ,, | ,, | ४९४ |
| ३० जर्मन. | ४६५ | ,, | ,, | ,, | ,, | ४६५ |
| ३१ गोंड. | ३४१ | ,, | ,, | ,, | ,, | ३४१ |
| ३२ गेलीक. | २४२ | ,, | ,, | ,, | ,, | २४२ |
| ३३ माले. | १०४ | ,, | १३२ | ,, | ,, | २३६ |
| ३४ बरमी. | २०७ | ,, | ,, | ,, | ,, | २०७ |
| ३५ इटालियन. | १८५ | ,, | ,, | ,, | ,, | १८५ |
| ३७ टर्की. | १८४ | ,, | ,, | ,, | ,, | १८४ |
| ३८ फ्रेंच. | १६६ | ,, | ,, | ,, | ,, | १६६ |
| काशमिरी. | १५२ | | | ,, | ,, | १५२ |
| दुसऱ्या. | ५९४ | २०९ | २४८ | ,, | १०६ | १,१५७ |
| न ओळखतां येण्यासारख्या. | ८ | ,, | ,, | ,, | ,, | ८ |
| नदाखल केलेल्या | १,७०० | २०४ | २०६ | ,, | ,, | २,१११ |
| एकंदर | १,५९,८५,००० | २८,७२,००० | ७९,२७,००० | १,३२,००० | २४,१५,००० | २,९३,३१,००० |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

## ग्रूप नंबर ६---मध्यप्रांत, संस्थानें, वऱ्हाड.

| नं० | भाषेचें नांव. | मध्यप्रांत. | संस्थानें. | वऱ्हाड, | एकंदर, |
|---|---|---|---|---|---|
| १ | हिंदी | ६४,९८,००० | ७,८०,०० | २,८०,००० | ७५,५८,००० |
| २ | मराठी | २१,१६,००० | १२,००० | २३,०२,००० | ४४,३०,००० |
| ३ | उरीय | ६,८६,००० | ९,१७,००० | ,, | १६,०३,००० |
| ४ | गोंड | १०,०५,००० | १,८३,००० | ९५,००० | १२,८३,००० |
| ५ | तेलगू | १,०१,००० | १६,००० | ४३,००० | १,६०,००० |
| ६ | उर्दू | १,५५,००० | ३,७०० | ,, | १,५८,७०० |
| ७ | हळबी | २,६०० | १,४०,६०० | ३०० | १,४३,४०० |
| ८ | कोरवा | ७१,००० | ४,००० | ३९,००० | १,१४,००० |
| ९ | जिप्सी पो. भा. | २४,००० | ६,००० | ७५,००० | १,०५,००० |
| १० | खोंड | २७० | ६६,००० | ,, | ६६,२७० |
| ११ | मारवाडी | २०,६०० | २,००० | ३६,६०० | ५९,२०० |
| १२ | मुंडा | २६,००० | २३,००० | ,, | ४९,००० |
| १३ | गुजराथी | १६,७०० | २८० | २१,००० | ३७,९८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | भील | २१,५०० | १९० | ४६० | २२,१५० |
| १५ | बैग | ७,६०० | ३१५ | ,, | ७,९१५ |
| १६ | इंग्रजी | ६,९०० | १५० | ६५० | ७,७०० |
| १७ | कानडी | ५,७०० | ,, | १,१०० | ६,८०० |
| १८ | खरिया | ४,९०० | १,९०० | ,, | ६,८०० |
| १९ | टामिळ | ५,८०० | ,, | ४४० | ६,२४० |
| २० | ओरेअन | १,५०० | २,८०० | ,, | ४,३०० |
| २१ | कमारी | ३,७०० | ,, | ,, | ३,७०० |
| २२ | पष्टू | ४४५ | २०० | १,००० | १,६४५ |
| २३ | बंगाली | १,५०० | १४० | ,, | १,६४० |
| २४ | पंजाबी. | १,००० | ,, | ३७५ | १,३७५ |
| २५ | लहान सहान कोलेरिअन पोटभाषा. | २०० | ५०० | ,, | ७०० |
| २६ | कच्छी | ३०० | ,, | ३४० | ६४० |
| २७ | फारशी | ११० | ,, | ४३० | ५४० |
| २८ | लहानसहान द्राविड पोटभाषा | ३५ | ३८० | ,, | ४१५ |

| नं० | भाषेचें नांव. | मध्यप्रांत. | संस्थानें. | वऱ्हाड. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| २९ | सावर | ४०० | ,, | ,, | ४०० |
| ३० | गडब | ,, | ३७५ | ,, | ३७५ |
| ३१ | बरमी | ३४५ | ,, | ,, | ३४३ |
| ३२ | पतनुली | ३ | ,, | २०० | २०३ |
| ३३ | अरबी | ,, | ,, | २०० | २०० |
| ३४ | गोआनी | ,, | ,, | १३५ | १३५ |
| ३५ | गुरखल | १२५ | ,, | ,, | १२५ |
| ३६ | कोंकणी | ,, | ,, | १० | १० |
| | दुसऱ्या | २०० | २३५ | ६३ | ५०८ |
| | दाखल नसलेल्या | ,, | ,, | ५ | ५ |
| | एकंदर. | १,०७,८४,००० | २१,६०,००० | २८,९७,००० | १,५८,४१,००० |

ग्रुप नंबर ७—हैदराबाद निजामचें राज्य.

| नं० | भाषेचें नांव. | बोलणारांची संख्या. |
|---|---|---|
| १ | तेलगु | ५०,३१,००० |
| २ | मराठी | ३४,९४,००० |
| ३ | कानडी | १४,५१,००० |
| ४ | उर्दू | ११,९८,००० |
| ५ | जिप्सी पोटभाषा. | १,५६,००० |
| ६ | हिंदी. | ७७,५०० |
| ७ | गोंड. | ३६,१६० |
| ८ | टामिल. | २९,३०० |
| ९ | गुजराथी. | २७,००० |
| १० | अरबी. | १३,००० |
| ११ | इंग्रजी. | ८,९०० |
| १२ | कोरवा. | ५,७०० |
| १३ | पष्टू. | २,९०० |
| १४ | पंजाबी. | २,४०० |
| १५ | मल्यालम. | १,२०० |
| १६ | फारशी. | ८१५ |
| १७ | उरिय. | १८० |
| १८ | गोआनी व पोर्तुगीज | १०५ |
| १९ | टर्की. | ९४ |
| २० | नीग्रो पोटभाषा. | ७४ |
|  | दुसऱ्या. | २३८ |
|  | दाखल न झालेल्या. | ५२७ |
|  | एकंदर. | १,१५,३७,००० |

## ग्रुप नंबर ८—मद्रास, संस्थानें, म्हैसूर व कुर्ग.

| नं० | भाषेचें नांव. | मद्रास. | संस्थानें. | म्हैसूर. | कुर्ग. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | टामिळ | १,४०,७९,००० | ८,४७,००० | १,५९,००० | १६,००० | १,५१,०१,००० |
| २ | तेलगू | १,३६,५४,००० | ५८,००० | ७,५२,००० | ३,७०० | १,४४,६७,७०० |
| ३ | मल्यालम | २६,८८,००० | २७,२१,००० | १,५०० | ११,००० | ५४,२१,५०० |
| ४ | कानडी | १४,४६,००० | १५,८०० | ३६,५६,००० | ७६,००० | ५१,९३,८०० |
| ५ | उरीय | १२,९२,००० | ,, | ५७५ | ,, | १२,९२,५७५ |
| ६ | उर्दू | ८,१७,००० | १७,७०० | २,३५,३०० | ६,९०० | १०,७६,६०० |
| ७ | टुलू | ४,६१,००० | १,२०० | १४,००० | १२,००० | ४,८८,२०० |
| ८ | मराठी | १,२३,५०० | १२,८०० | ६५,००० | २,७०० | २,०४,००० |
| ९ | खोंड | १,९१,००० | ,, | ,, | ,, | १,९१,००० |
| १० | कोंकणी | १,३३,००० | १८,००० | ४,००० | २,१०० | १,५७,१०० |
| ११ | सावर | १,०२,००० | ,, | ,, | ,, | १,०२,००० |
| १२ | जिप्सी पो. भा. | ६४,६०० | ४२० | ३२,००० | १५४ | ९७,१७४ |
| १३ | पतनुली | ७३,००० | १,५०० | ७७० | ,, | ७५,२७० |
| १४ | गोंड | ५८,६०० | ,, | ,, | ,, | ५८,६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | इंग्रजी | ३७,००० | १,७७० | ९,९०० | ४७५ | ४९,१४५ |
| १६ | कोरगु | ९९० | ” | ” | ३५,००० | ३५,९९० |
| १७ | बडग | ३०,६०० | ” | ” | ” | ३०,६०० |
| १८ | गडब | २९,४०० | ” | ” | ” | २९,४०० |
| १९ | गुजराथी | ६,९०० | ७९० | १,४०० | १२६ | ९,२१६ |
| २० | कुरूंबर | ३,७०० | १,५०० | ” | २,८०० | ८,००० |
| २१ | हिंदी | ४५० | ” | ४,००० | ” | ४,४५० |
| २२ | अरबी | ३,१०० | १,२०० | ” | ” | ४,३०० |
| २३ | गोआनी व पोर्चूगीज | ३,००० | ९५० | ” | ” | ३,९५० |
| २४ | माल्ह | ३,२०० | ” | ” | ” | ३,२०० |
| २५ | येरव | ” | ” | ” | २,६०० | २,६०० |
| २६ | फारशी | २१३ | ” | २,१०० | ” | २,३१३ |
| २७ | कोवगर | १,९०० | ” | ” | ” | १,९०० |
| २८ | मारवाडी | १,१०० | ” | ५८० | ” | १,६८० |
| २९ | बंगाली | १,१७५ | ” | ६१ | ” | १,२३६ |
| ३० | कोटं | १,२०० | ” | ” | ” | १,२०० |
| ३१ | कच्छी | ५६० | ३८० | ” | ” | ९४० |

| नं० | भाषेचें नांव. | मद्रास. | संस्थानें. | म्हैसूर. | कुर्ग. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | बरमी | ८७० | ” | ” | ” | ८७० |
| ३३ | हीब्रू | ” | ४०० | ” | ” | ४०० |
| ३४ | तोड | ७४० | ” | ” | ” | ७४० |
| ३५ | फ्रेंच | ५५० | ” | ६६ | ” | ६१६ |
| ३६ | पंजाबी | ५०० | ” | ” | ” | ५०० |
| ३७ | हळबी | ३५० | ” | ” | ” | ३५० |
| ३८ | जर्मन | ३३० | ” | ” | ” | ३३० |
| ३९ | संस्कृत | १५१ | ” | ” | ” | १५१ |
| ४० | इटालियन | ” | ” | ९० | ” | ९० |
| ४१ | पष्टू | ” | ” | ८० | ” | ८० |
| | दुसऱ्या | ७१० | १४० | ३१२ | १५० | १,३१२ |
| | दाखल न झालेल्या | ३,१९,००० | २२० | ३,८६० | १४० | ३,२३,२२० |
| | एकंदर. | ३,५६,३०,००० | ३७,००,००० | ४९,४४,००० | १,७३,००० | ४,४४,४७,००० |

ब्रह्मदेश—१ लोअर ब्रह्मदेश, २ अपर ब्रह्मदेश.

| नं० | भाषेचें नांव. | अपर ब्रह्मदेश. | लोअर ब्रह्मदेश. | एकंदर. |
|---|---|---|---|---|
| १ | बरमी | २७,३७,००० | २८,१८,५०० | ५५,५५,५०० |
| २ | करेन | ८,८०० | ६,६६,००० | ६,७४,८०० |
| ३ | अराकनी | ३३० | ३,४६,००० | ३,४६,३३० |
| ४ | तलंग | १८४ | २,२६,००० | २,२६,१८४ |
| ५ | बंगाली | १६,००० | १,६३,००० | १,७९,००० |
| ६ | शान | ७९,६०० | ९४,४०० | १,७४,००० |
| ७ | खिइन | २६,७०० | १,००,००० | १,२६,७०० |
| ८ | हिंदी | २७,९०० | ७०,००० | ९७,९०० |
| ९ | तेलगू | ६,७०० | ६१,२०० | ६७,९०० |
| १० | टामिल | ४,३०० | ५६,४०० | ६०,७०० |
| ११ | चिनी | ५,५०० | ३१,००० | ३६,५०० |
| १२ | इंग्रजी | ४,५०० | १३,१७५ | १७,६७५ |
| १३ | मणिपुरी | १४,००० | १,४०० | १५,४०० |
| १४ | पंजाबी | ६,००० | १,१०० | ७,१०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | कखिइन | ३,७६० | ,, | ३,७६० |
| १६ | उरिया | १,२४० | २,१०० | ३,३४० |
| १७ | पलांग | २,८९० | ,, | २,८९० |
| १८ | मले | ,, | २,१९० | २,१९० |
| १९ | सालोन. | ,, | १,६०० | १,६०० |
| २० | गुजराथी | १६२ | ६०० | ७६२ |
| २१ | निपाली पोटभाषा | ३०९ | ३०० | ६०९ |
| २२ | फारशी | ,, | ६०० | ६०० |
| २३ | हीब्रू | २२० | ३३२ | ५५२ |
| २४ | मराठी | ,, | ५०० | ५०० |
| २५ | अरबी | ,, | ४१० | ४१० |
| २६ | जर्मन | ,, | ३४० | ३४० |
| २७ | अरमीनियन | ,, | २०५ | २०५ |
| २८ | इटालीयन | ,, | १४९ | १४९ |
| २९ | गोआनी पोर्चूगीज | ,, | १०८ | १०८ |
| | दुसऱ्या | ३२२ | ५३० | ८५२ |
| | एकंदर | २९,४७,००० | ४६,५८,६०० | ७६,०५,६०० |

## किरकोळ ग्रुप—एडन, केटा, अंडामन.

| न० | भाषेचें नांव. | एडन. | केटा. | अंडामन. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | अरबी | २४,००० | " | ४४ | २४,०४४ |
| २ | हिंदी | ४,२२० | ७,००० | ५,९०० | १७,१२० |
| ३ | पंजाबी | " | १०,५०० | १,५०० | ११,००० |
| ४ | सोमाली | ७,४०० | " | " | ७,४०० |
| ५ | मराठी | १,४०० | १,३४० | ९०० | ३६४० |
| ६ | पष्टू | २४५ | १८०० | ४१४ | २,४५९ |
| ७ | इंग्रजी | २,१०० | २८०० | ४३६ | ५३३६ |
| ८ | गुजराथी | १,६०० | २५० | ३५४ | २,२०४ |
| ९ | सिंधी | ५१ | १,६७५ | १९९ | १,९२५ |
| १० | बंगाली | ८२ | ४४ | १,६०० | १,७२६ |
| ११ | तेलगू | १०६ | " | ६९० | ७९६ |
| १२ | टामिल | ५४ | " | ५६२ | ६१६ |
| १३ | बरमी | " | " | १,००० | १,००० |
| १४ | बलोच | " | ८३५ | " | ८३५ |

| न० | भाषेचें नांव. | एडन. | केटा. | अंडामन. | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| १५ | स्वहिली | ७९५ | ,, | ,, | ७९५ |
| १६ | गोआनी व पोर्तुगीज | ५७० | ९६ | ,, | ६६६ |
| १७ | फारशी | ६१ | ४४० | ,, | ५०१ |
| १८ | दुसऱ्या नीग्रो पोटभाषा | ४५० | ,, | ,, | ४५० |
| १९ | कानडी | ,, | ,, | ३९५ | ३९५ |
| २० | मल्यालम | ,, | ,, | ३११ | ३११ |
| २१ | उरिय | ,, | ,, | २९२ | २९२ |
| २२ | कच्छी | २८० | ,, | ,, | २८० |
| २३ | मारवाडी | ,, | १२० | ६४ | १८४ |
| २४ | हीब्रू | १७० | ,, | ,, | १७० |
| २५ | काशमीरी | ,, | १२८ | ,, | १२८ |
| २६ | गोंड | ,, | ,, | ,, | ११७ |
| २७ | शान | ,, | ,, | ६७ | ६७ |
| २८ | कोरवा | ,, | ,, | १०१ | १०१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ ग्रीक | | ९७ | ,, | ,, | ९७ |
| ३० इटालियन | | ९२ | ,, | ,, | ९२ |
| ३१ स्पानिश | | ९० | ,, | ,, | ९० |
| ३२ फ्रेंच | | ४३ | ,, | ,, | ४३ |
| ३३ असामी | | ,, | ,, | ४० | ४० |
| ३४ करेन | | ,, | ,, | ३८ | ३८ |
| ३५ तिबेटन | | ,, | ,, | ३७ | ३७ |
| ३६ जर्मन | | ३५ | ,, | ,, | ३५ |
| दुसऱ्या | | १५३ | १२२ | ११९ | ३९४ |
| एकंदर | | ४४,००० | २७,२७० | १५,६०० | ८६,८७० |

आतां वर जे ग्रुप सांगितले त्यांत भाषांचे संबंधानें काय स्थिति आहे तिजविषयीं विचार करूं. पहिला ग्रुप वायव्यप्रांत आहे. ह्यांत वायव्यप्रांत सरकारचे अमलाखालीं असलेले प्रदेश, ह्या सरकारच्या ताब्यांतील संस्थानें व अयोध्या प्रांत यांचा समावेश केला आहे. ह्या ग्रुपमध्यें लहान मोठ्या अशा २४ भाषा आहेत, व त्या बोलणारांची संख्या ४,७७,००,००० आहे. ह्यांपैकीं हिंदी बोलणारे ४,६४,००,००० ह्मणजे शेंकडा ९७ आहेत व बाकीच्या २३ भाषा बोलणारे शेंकडा ३ आहेत. हिंदीच्या खालोखाल पहारी भाषा आहे. कुमाओनी, निपाली, गऱ्हवाली, पंजाबी व पश्चिम असे हिचे पांच प्रकार आहेत. ही भाषा बोलणारे सुमारें ११,७३,००० ह्मणजे शेंकडा २ आहेत. बाकी राहिलेल्या इंग्रजी, बंगाली, पंजाबी, मराठी, गुजराथी, मारवाडी, तिबेटन, बरमी, पष्टू, तेलगू, टामिल, फारशी, मणिपुरी, सिंधी, उरिय, काशमिरी, चिनी व कनावरी, ह्या बोलणारे सुमारें १,२४,००० ह्मणजे शेंकडा सुमारें १ आहेत व त्यांपैकीं बहुतेक उपरी आहेत असें म्हटलें असतां चालेल. ह्या हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, वायव्यप्रांत ग्रुपखालीं येणाऱ्या भाषा जरी दिसण्याला २४ दिसतात, तरी त्यांपैकीं बहुतेक नांवाला मात्र आहेत. हिंदी भाषा ज्यांची स्वभाषा आहे असे शेंकडा ९७ आहेत; ह्याशिवाय ही भाषा समजणारे कांहीं जास्त असले पाहिजेत हें उघड आहे; तेव्हां तीच भाषा मुख्य भाषा आहे व ह्या ग्रुपमध्यें एकभाषा करण्याविषयीं विचार करणें ह्मणजे मुख्यत्वें ह्या भाषेविषयीं विचार करणें आहे, हें सांगावयास नको.

दुसरा ग्रुप पंजाब—ह्यांत पंजाब सरकारचे अमलाखालीं असलेले प्रदेश व ह्या सरकारचे ताब्यांतील संस्थानें ह्यांचा समावेश होतो. ह्यांत २९ निरनिराळ्या भाषा असून त्या बोलणारे २,५१,३०,००० आहेत. ह्यांपैकीं पंजाबी बोलणारे १,५७,४९,००० ह्मणजे शेंकडा ६३ व हिंदी बोलणारे ४१,५८,००० ह्मणजे शेंकडा सुमारें १७

मिळून शेंकडा ८० आहेत व बाकीच्या २३ भाषांमिळून शेंकडा २० आहेत. हिंदीच्या खालोखाल *जतकी, पहारी ( पश्चिम ) पष्टू व मारवाडी अशा चार भाषा असून त्या बोलणारे अनुक्रमें १९,००,०००; १६,००,०००; १०,००,०००; व ५,००,००० ह्मणजे शेंकडा सुमारें ८,६,४ व २ आहेत. व बाकी राहिलेल्या १९ भाषा बोलणारे पुरे शेंकडा १ देखील नाहींत. ह्यावरून असें दिसून येईल कीं, पंजाब ग्रुपखालीं जरी २५ भाषा येतात तरी त्यांपैकीं बलोच, काशमिरी, तिबेटन, जिप्सी, गुरकाली, कनावरी वगैरे १९ भाषांत कांहीं अर्थ नाहीं. जतकी, पहारी ( पश्चिम ) पष्टू व मारवाडी ह्या बरेच अंशीं स्थाईक आहेत व त्या बोलणारेही कांहीं लोक आहेत, तथापि पंजाबी व हिंदी बोलणारांचा भरणा विशेष असल्यामुळें पंजाब ग्रुपमध्यें ह्या दोन भाषा मुख्य आहेत; व वायव्यप्रांतांत एक भाषा करणें झाल्यास ज्याप्रमाणें हिंदीविषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा त्याप्रमाणें पंजाबग्रुपमध्यें एक भाषा करावयाची झाल्यास पंजाबी व हिंदी ह्या दोन भाषांविषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा.

तिसरा ग्रुप बंगाल—ह्या खालीं बंगालप्रांत, त्यांतील संस्थानें व असामप्रांत हीं धरिलीं आहेत. एकंदर जे ग्रुप आहेत त्यांपैकीं बंगाल ग्रुप फारच मोठा आहे. ह्या ग्रुपमध्यें लहान मोठ्या अशा ६६ भाषा आहेत; म्हणजे हिंदुस्थानांत ज्या भाषा आहेत त्यांच्या निम्याहून अधिक ह्या ग्रुपमध्यें आहेत. ह्यांत जितकें भाषावैचित्र्य दिसून येतें

---

* सन १८९१ चे खाने सुमारीचे रिपोर्टांत हिंदुस्थानांतील भाषांची जी एकंदर टीप दिली आहे तींत जतकी भाषेचा कोठें उल्लेख केलेला आह्मास आढळून आला नाहीं. परंतु निरनिराळ्या प्रांतांत कोणत्या भाषा चालतात ह्याविषयीं जी माहिती दिली आहे तींत जतकी भाषेचा उल्लेख केलेला आढळून येतो. तेव्हां कांहीं चूक आहे किंवा काय हें समजत नाहीं. पंजाब प्रांतांतील भाषांपैकीं ही एक भाषा आहे असें समजून वरील हकीकत दिली आहे असें समजावें.

तितकें दुसरे ठिकाणीं दिसून येत नाहीं. ह्या १६ भाषा बोलणारांची संख्या ८,००,००,००० आहे. हिजपैकीं बंगाली बोलणारे सुमारें ४,१४,००,०००, म्हणजे शेंकडा सुमारें ५२, हिंदी बोलणारे २,६४,००,००० म्हणजे शेंकडा ३३ व उरिया बोलणारे ६१,११,००० म्हणजे शेंकडा सुमारें ८ मिळून शेंकडा सुमारें ९३ आहेत व बाकी राहिलेल्या १३ भाषा बोलणारे शेंकडा ७ आहेत. ह्या १३ भाषांपैकीं संथाळी बोलणारे-१७,००,००० ह्मणजे शेंकडा दोन, असामी बोलणारे १४,००,००० ह्मणजे शेंकडा सुमारें २, मुंडा बोलणारे ६,००,००० ह्मणजे शेंकडा सुमारें १ असे आहेत, व बाकी राहिलेल्या १० भाषांमिळून शेंकडा २ आहेत. बंगाल ग्रुपमध्यें जंगली भाषांचा भरणा जितका दृष्टीस पडतो तितका दुसरे ठिकाणीं दृष्टीस पडत नाहीं. कचारी, खासी, गारो, टिपरा, निपाली, नागकोटा, मेच, मिकीर, कोरवा, खोंड, खरिआ, लुशाई, बैग, लालुंग, मिरी, मालपाहाडिया, मुरमी, कुका, लिंबु, मागर, जुआंग, लेपच, कोच, निकरी, सुनुवार, खामटी वगैरे बहुतेक भाषां बरेच अंशीं जंगली आहेत. ज्याप्रमाणें पहिल्या दोन ग्रुपमध्यें उपरी भाषा कमजास्त मानानें दृष्टीस पडतात त्याप्रमाणें ह्या ग्रुपमध्येंही दृष्टीस पडतात.

वरील हकीकतीवरून असें कळून येईल कीं, बंगाल ग्रुपखालीं जरी १६ भाषांची गणती झाली आहे असें दिसतें, तरी १० भाषांमिळून ज्या अर्थी शेंकडा २ याप्रमाणें प्रमाण दिसतें त्या अर्थी त्या भाषा नांवाला आहेत असें ह्मटलें असतां चालेल. बाकी राहिलेल्या ६ भाषांपैकीं संथाळी आसामी व मुंडा ह्या भाषा बोलणारे शेंकडा ५ दृष्टीस पडतात व ज्याप्रमाणें वायव्यप्रांत ग्रुपमधील पहारी भाषा व पंजाब ग्रुपमधील जतकी, पहारी ( पश्चिम ) पष्टु व कांहीं अंशीं मारवाडी ( बाग्री ) ह्याविषयीं कदाचित् विचार करण्याचें कारण कांहीं अंशीं पडेल, त्याप्रमाणें बंगाल ग्रुपमधील संथाळी, असामी, व

कांहीं अंशीं मुंडा ह्या तीन भाषांविषयीं विचार करण्याचें कारण पडेल हें जरी खरें आहे, तरी बंगाल ग्रुपमध्यें बंगाली हिंदी व उरिया बोलणारे शेंकडा ९३ असल्यामुळें व ह्या भाषा समजणारे इतर भाषा बोलणारांपैकीं आणखी कांहीं जास्त असल्यामुळें त्या तीन भाषा मुख्य समजल्या पाहिजेत; व वायव्य प्रांतांत एक भाषा करणें झाल्यास हिंदी विषयीं, व पंजाब ग्रुपमध्यें पंजाबीं व हिंदी ह्यांविषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा, त्याप्रमाणें बंगाल ग्रुपमध्यें एक भाषेविषयींचा प्रश्न झटला ह्मणजे बंगाली, हिंदी व उरिया ह्या भाषांचे संबंधाचा आहे.

चवथा ग्रुप—मध्यहिंदुस्थान.—ह्या ग्रुपमध्यें मध्यहिंस्थानांतील ग्वालेर, इंदूर, रजपूत, भोपाळ वगैरे संस्थानें व ह्यांत व ह्यांतील आगगाड्या कंटानमेंट ह्यांचे हद्दींत राहणारे लोकांचा समावेश होतो. हा प्रदेश बराच विस्तीर्ण आहे व ह्यांतील लोकसंख्या सुमारें २,२९,००,००० आहे; परंतु ह्यांपैकीं फक्त ६,६०,००० लोकांच्या भाषांची गणती झाली आहे. बाकींच्या विषयीं कांहीं माहिती मिळाली नाहीं. तेव्हां त्याविषयीं कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं. तथापि ह्या विस्तीर्ण प्रदेशांत हिंदीचा फैलाव फार असून तिच्या खालोखाल मराठीचा प्रसार बराच असल्यामुळें ह्या प्रदेशांत एक भाषेविषयीं विचार करावयाचा ह्मणजे हिंदी व मराठी ह्यांविषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा आहे.

ग्रुप नंबर ५—मुंबई.—ह्यांत मुंबई इलाखा ( सिंधशिवाय ), सिंध, मुंबई सरकारचे ताब्यांतील संस्थानें, खैरपूर, व बडोदें हीं येतात. ह्या ग्रुपमध्यें लहान मोठ्या अशा सुमारें ३८ भाषा आहेत व त्या बोलणारे सुमारें २,९३,००,००० लोक आहेत. ह्यांपैकीं गुजराथी बोलणारे १,०४,५३,००० ह्मणजे शेंकडा ३६, मराठी बोलणारे १,०४,२४,००० ह्मणजे शेंकडा ३६, कानडी बोलणारे, ३०,६८,००० ह्मणजे शेंकडो १०, व सिंधी बोलणारे २९,६६,००० ह्मणजे शेंकडा

९ मिळून शेंकडा ९१ आहेत. व बाकीच्या ३४ भाषांमिळून शेंकडा ९ आहेत. ह्या ३४ भाषांमध्यें उर्दू, कच्छी, व मारवाडी बोलणारे अनुक्रमें शेंकडा ४, १, व १, असे आहेत. वर सांगितलेल्या चार मुख्य भाषा व उर्दू, कच्छी, व मारवाडी, अशा तीन भाषां मिळून सात भाषा एकीकडे ठेविल्यावर ३१ भाषा बोलणारे सारे शेंकडा ३ आहेत. गुजराथी भाषा बोलणारे बडोदे, काठेवाड वगैरे संस्थानांत फार असून ब्रिटिश मुलखांत कमी आहेत. ही गोष्ट मराठी, कानडी, व सिंधी ह्या भाषांस लागू नाहीं. त्या भाषा बोलणारे ब्रिटिश मुलखांत फार असून त्या मानानें संस्थानांत बरेच कमी आहेत. ह्या एकंदर हकीकती- विषयीं विचार केला असतां आपणांस कळून येतें कीं, बलोच, भील, कोंकणी, ब्रहुही, पोर्चूगीज, वगैरे ३० भाषा ह्या केवळ भरतीदाखल आहेत. उर्दूचा भरणा कांहीं जास्त दिसतो व त्याविषयीं कदाचित् विचार करावा लागेल. कच्छी व मारवाडी ह्या पोटभाषा आहेत. तेव्हां त्यांचा अंतर्भाव मुख्य भाषांत होईलच. बाकी राहिलेल्या गुजराथी, मराठी, कानडी, व सिंधी ह्या बोलणारे शेंकडा ९१ आहेत. व ह्या भाषांचे द्वारें बहुतेक ठिकाणीं व्यवहार चालतो. ह्या मुळें ह्या चार भाषा मुख्य आहेत, असें समजलें पाहिजे. व मुंबई इलाख्यांत एक भाषा करितांना ह्या चार भाषांविषयीं मुख्यत्वें विचार करावा लागेल. मुंबई इलाख्यांत उर्दू ही दरबारची भाषा नाहीं, परंतु हिच्या द्वारें कांहीं ठिकाणीं शिक्षण देण्याचा क्रम चालू आहे. ह्या कारणावरून व दुसऱ्या आणखी कांहीं कारणांवरून ह्या भाषेविषयीं विचार करावा लागेल हें येथें सांगितलें पाहिजे.

ग्रुप नंबर ६—मध्यप्रांत- ह्या ग्रुपमध्यें मध्यप्रांत, मध्यप्रांत सरकारचे ताब्यांतील संस्थानें व वऱ्हाड यांचा समावेश केला आहे. वऱ्हाड प्रांत व मध्यप्रांत हे जवळ जवळ असल्यामुळें परस्परांशीं दळण- वळण ठेवण्यास सुलभ पडतें. शिवाय, वऱ्हाडांतील भाषांचे मध्य-

प्रांतांतील भाषांशीं कांहीं साम्य आहे. ह्मणून सोईसाठीं दोन्ही प्रांत मिळून एक ग्रुप मानिला आहे. ह्या ग्रुपमध्यें एकंदर ३६ भाषा असून त्या बोलणारे १,९८,४१,००० आहेत. ह्यांपैकीं हिंदी बोलणारे ७९,९८,००० ह्मणजे शेंकडा ४८, मराठी बोलणारे ४४, ३०,००० ह्मणजे शेंकडा २८, व उरिय बोलणारे १६,०३,००० ह्मणजे शेंकडा १० मिळून शेंकडा ८६ आहेत. ज्याप्रमाणें वायव्य प्रांतात पहारी व बंगाल्यांत संथाली, त्याप्रमाणें मध्यप्रांतांत गोंड भाषा होय. ही भाषा बोलणारे १२,८३,९०० म्हणजे शेंकडा ८ आहेत. तेलगू व उर्दू प्रत्येकीं १ आहेत व बाकी राहिलेल्या ३० भाषांचे लोक शेंकडा ४ आहेत. ज्याप्रमाणें बंगाल ग्रुपमध्यें बऱ्याच जंगली भाषा दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें मध्यप्रांत ग्रुपमध्यें हळबी कोरवा, मुंडा, जिप्सी, खोंड, भील, बैग, खरीया, कमारी, सावर वगैरे जंगली भाषा दृष्टीस पडतात.

मध्यप्रांतांतील भाषांचे संबंधानें वर जी हकीकत दिली तिजवरून असें दिसून येईल कीं, ३६ भाषांपैकीं ३० भाषा बोलणारे शेंकडा ४ आहेत. अशा प्रकारचे भाषांची भरती प्रत्येक ग्रुपमध्यें असून तींत विशेष अर्थ नाहीं. तेलगू व उर्दू ह्या भाषा बोलणारे कांहीं दृष्टीस पडतात; परंतु एकंदर लोकसंख्येचे मानानें ते फारसे नाहींत शिवाय त्याविषयीं दुसऱ्या कांहीं ग्रुपमध्यें विचार करण्याचें कारण पडेल तेव्हां त्या वगळल्या असतां चालेल. गोंड भाषा बोलणारे शेंकडा ८ आहेत; परंतु गोंड भाषा जंगली भाषा आहे. ती शिकविण्यास जीं साधनें पाहिजेत तीं नाहींत व मुख्य भाषांचे प्रसारामुळें ज्याप्रमाणें जंगली भाषांचा हळू हळू लोप होत आहे त्याप्रमाणें ह्याही भाषेचा लोप होईल. तेव्हां तिजविषयीं विचार करण्याचें कारण दिसत नाहीं. बाकी तीन भाषा राहिल्या. त्या हिंदी मराठी व उरिय. ह्या बोलणारे शेंकडा ८६ आहेत. अनेक कारणांनीं

ह्या समजणें अवश्य आहे, म्हणून त्यां समजणारे आणखी [illegible] जास्त असले पाहिजेत, तेव्हां ह्या भाषांम[illegible] भाषा समजलें असतां हरकत नाहीं. व एक भाषा करण्याविषयीं उद्योग करितांना मुंबई ग्रुपमध्यें मराठी, गुजराथी, कानडी व सिंधी ह्यांविषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा, त्याप्रमाणें मध्यप्रांत ग्रुपमध्यें एक भाषा करावयाची ह्मणजे हिंदी, मराठी, व उरिय ह्या भाषांविषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा.

ग्रुप नंबर ७–ह्मणजे निजामचें राज्य.–हा स्वतंत्र ग्रुप धरिला आहे. ह्यांतील भाषांचे इतर कांहीं प्रांतांतील भाषांशीं बरेंच साम्य आहे, तथापि ह्या राज्यांतील लोकांचें इतर प्रांतांतील लोकांशीं ह्मणण्यासारखें दळणवळण नसल्यामुळें हा स्वतंत्र ग्रुप करणें इष्ट आहे. निजामचे राज्यांत निरानिराळ्या सुमारें २० भाषा आहेत व त्या बोलणारे १,१९,३७,००० आहेत. त्यांपैकीं तेलगू बोलणारे ५०,३१,००० ह्मणजे शेंकडा ४४, मराठी बोलणारे ३४,९४,००० ह्मणजे शेंकडा ३०, कानडी बोलणारे १४,९१,००० ह्मणजे शेंकडा १३ व उर्दू बोलणारे ११,९८,००० म्हणजे शेंकडा १० आहेत. ह्यावरून ह्या चार भाषां मिळून शेंकडा ९७ आहेत व बाकी राहिलेल्या १६ भाषा मिळून शेंकडा ३ आहेत. तेव्हां १६ भाषा नांवाला असून बाकीच्या चार भाषा म्हणजे तेलगू, मराठी, कानडी व उर्दू ह्या बोलणारे शेंकडा ९७ असल्यामुळें त्या मुख्य भाषा समजावयाच्या व निझामचे राज्यांत एक भाषा करितांना ह्या चार भाषांविषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा.

ग्रुप नंबर ८–मद्रास.–हा ग्रुप बंगालच्या खालोखाल आहे. ह्यांत मद्रास सरकारच्या अमलाखालचे प्रदेश, ह्या सरकारचे ताब्यांतील प्रदेश, कुर्ग व म्हैसूर प्रांत हे येतात. निकट संबंधामुळें ज्याप्रमाणें बडोदे संस्थान हें आमच्यांपैकींच आहे असें आम्ही समजतों, त्याप्रमाणें कुर्ग व म्हैसूर प्रांत ह्यांस मद्रासी लोक समजतात. शिवाय,

बडोदे प्रांतांतील भाषा ह्या मुंबई प्रांतांतील भाषांहून निराळ्या नस-
ल्यामुळें दोहीं प्रांतांविषयीं एकत्र विचार करणें ज्याप्रमाणें इष्ट आहे,
त्याप्रमाणें कुर्ग व म्हैसूर ह्या दोन प्रांतांतील भाषा मद्रास इलाख्यांतील
भाषांहून भिन्न नसल्यामुळें ह्या प्रांतांविषयीं एके ठिकाणीं विचार करणें
इष्ट आहे. मद्रास ग्रुपमध्यें एकंदर ४१ भाषा असून त्या बोलणारे सुमारें
४,४४,४७,००० आहेत. ह्यांपैकीं, टामिल बोलणारे १,५१,००,०००
म्हणजे शेंकडा ३४, तेलगू बोलणारे १,४४,६७,००० म्हणजे शेंकडा
३३, मल्यालम बोलणारे ५४,२१,००० म्हणजे शेंकडा १२ व
कानडी बोलणारे ५१,९३,००० म्हणजे शेंकडा १२ मिळून शेंकडा
९१ आहेत. उरिय व उर्दू ह्या भाषांचाही भरणा बराच असून त्या
बोलणारे अनुक्रमें शेंकडा ३ व २ आहेत; व बाकी राहिलेल्या ३९
भाषा बोलणारे शेंकडा ४ आहेत. ह्या हकीकतीवरून असें समजून
येतें कीं, मद्रास ग्रुपमध्यें जरी ४१ भाषा आहेत, तरी त्यांपैकीं ३९
भाषांत म्हणण्यासारखा अर्थ नाहीं. उरिय व उर्दू ह्या भाषा बोलणा-
रांचा कांहीं भरणा आहे, व त्यांविषयीं कांहीं विचार करावा लागेल.
परंतु टामिल, तेलगू, मल्यालम व कानडी ह्या भाषा बोलणारे सुमारें
शेंकडा ९१ असल्यामुळें ह्या मुख्य भाषा आहेत, असें समजणें योग्य
आहे व ह्या ग्रुपमध्यें एक भाषा करण्याविषयींचा विचार ह्मणजे ह्या
भाषांविषयींचा विचार होय; तथापि उरिय व उर्दू ह्यांचा भरणा ब-
राच आहे ह्यामुळें व दुसऱ्या कारणांमुळें ह्या दोन भाषांविषयींही
विचार करावा लागेल.

येथवर पूर्वसंकल्पानुरूप आठ ग्रुपविषयीं विचार झाला. ब्रह्म देशा-
विषयीं निराळा विचार करूं असें आह्मीं सांगितलें होतें. त्याप्रमाणें
त्याविषयीं व किरकोळ ग्रुप जो केला आहे त्याविषयीं थोडक्यांत
सांगून हें प्रकरण संपवूं.

लोअर व अपर ब्रह्मदेश असे ब्रम्हदेशाचे दोन विभाग आहेत,

असें मागें सांगितलेंच आहे. हे दोन्ही विभाग मिळून एक ग्रुप करणें योग्य आहे. ह्या ग्रुपमध्यें लहान मोठ्या अशा २९ भाषा असून त्या बोलणारे ७६,००,००० आहेत. ह्यांपैकीं बरमी भाषा बोलणारे शेंकडा ७३ आहेत. व बाकीच्या २८ भाषा मिळून शेंकडा २७ आहेत. ह्या २८ भाषांपैकीं करेन बोलणारे शेंकडा ९, अराकनी ५, तलेंग ३, बंगाली २, शान २, खिइन २, व हिंदी १, असे आहेत. तेव्हां बाकीच्या राहिलेल्या २१ भाषा बोलणारे शेंकडा ३ आहेत. ह्यावरून ब्रह्म देशांतील २९ भाषांपैकीं २१ भाषा नांवाला आहेत. बाकी राहिलेल्या आठ भाषांपैकीं बंगाली व हिंदी ह्याविषयीं व्यवस्था लागलीच आहे. करेन, वगैरे कांहीं भाषा जंगली भाषांसारख्या आहेत असें म्हटलें असतां चालेल. मुख्य देशीभाषा ह्मटली ह्मणजे बरमी भाषा आहे. तेव्हां ब्रम्ह देशांत एक भाषा करण्याविषयींचा विचार ह्मणजे बरमी भाषेविषयींचा विचार आहे.

किरकोळ ग्रुपमध्यें एडन, क्वेटा व अंडामन[१] ह्यांचा समावेश होतो. ह्यांत सुमारें ४० भाषा असून त्या बोलणारे सुमारें ८७,००० लोक आहेत. ह्या ग्रुपमध्यें अरबी भाषा बोलणारांचा भरणा बराच आहे. त्याचे खालोखाल हिंदी, पंजाबी, सोमाली, व मराठी ह्यांचा अनुक्रमें भरणा आहे. ह्या ग्रुप संबंधानें ह्यापेक्षां विशेष कांहीं सांगावयाचें नाहीं. हा ग्रुप निराळा मानला काय किंवा न मानिला काय सारखेंच आहे.

---

१—अंडामन बेटांत राहणारे लोक म्हटलें ह्मणजे, ज्यांनीं भयंकर गुन्हे केल्यामुळें ज्यांस काळेपाण्याची शिक्षा झाली आहे असे मुख्यत्वें होत. ह्या लोकांविषयीं विचार करितां लोकसंख्येचे मानानें हिंदी भाषा बोलणारांचा पहिला नंबर आहे. ह्यांचे खालोखाल बरमी, पंजाबी, मराठी बंगाली मल्यालम, तेलगू, तामील, कानडी, गुजराथी व उरिय ह्या भाषा बोलणारे आहेत. तेव्हां हिंदी बोलणारांचा नंबर भाषेच्याच संबंधानें पहिला नसून गुन्हे करण्यांतही पहिलाच आहे. त्याचप्रमाणें आमचा नंबर भाषेच्या संबंधानें चवथा आहे तोच गुन्ह्याचे बाबतींत आम्ही कायम ठेविला आहे. बंगाली लोकांचा नंबर भाषेच्या संबंधानें दुसरा आहे; परंतु गुन्ह्यांचे संबंधानें त्यांचा नंबर पांचवा आहे.

आतां तीन भागांत जी माहिती दिली तिचें थोडक्यांत कथन करून एक भाषेचा विषय तूर्त पुरा करूं. हिंदुस्थानची लोकसंख्या २८,७३,००,००० आहे. ही ब्रह्मदेश धरून आहे. ह्यांपैकीं काश्मीर, राजपुताना, मध्यहिंदुस्थान, विजगापटन व चितेगांग डोंगर ह्या ठिकाणीं राहाणारे लोकांचे भाषांची गणती झाली नाहीं. हे लोक सुमारें २,५२,००,००० आहेत. ह्मणून हे लोक वगळणें भाग आहे. ब्रह्मदेश हा निराळा देश आहे, ह्मणून त्यांत असणारे ७६,००,००० लोक वगळणें योग्य आहे. तेव्हां हिंदुस्थान देशांतील भाषांविषयीं विचार करावयाचा म्हणजे २५,४५,००,००० लोकांचे भाषांविषयीं विचार करावयाचा.

हिंदुस्थानांत लहान मोठ्या अशा सुमारें ११५ भाषा आहेत. ही संख्या नांवाला मात्र आहे. ह्यांपैकीं कांहीं भाषा कोर्टाच्या भाषा असून त्यांचे द्वारें शिक्षण देण्यांत येत आहे. कांहीं उपरी असून त्या कमजास्त मानानें प्रत्येक सुधारलेल्या देशांत आढळून येतात. कांहीं भाषा मुख्य भाषांच्या पोटभाषा आहेत; व कांहीं जंगली लोकांच्या भाषा असून त्यांस व्याकरण नाहीं, लिपी नाहीं किंवा कोणतेही प्रकारचा धरबंध नाहीं. ११५ भाषांपैकीं हिंदी शेंकडा ३४, बंगाली, १६, तेलगू ८, मराठी ८, पंजाब ७, टामिल ६, गुजराथी ४, कानडी ४, उरिय ४, मल्यालम २, उर्दू १, व सिंधी १; मिळून १२ भाषा बोलणारे शेंकडा ९५ आहेत. परंतु हें प्रमाण ज्यांच्या ह्या स्वभाषा आहेत त्यांचे आहे. ह्या भाषा व्यवहारास उपयोगीं पडण्यासारख्या असल्यामुळें त्या समजणारे बाकी राहिलेल्या शेंकडा ५ पैकीं कांहीं जास्त लोक असले पाहिजेत. तेव्हां हिंदुस्थानच्या भाषांविषयीं विचार करावयाचा ह्मणजे ह्या १२ भाषांविषयीं विचार करावयाचा व या देशांत एक भाषेविषयींचा प्रश्न ह्मणजे ह्या १२ भाषांविषयींचा प्रश्न आहे. इंग्रजी भाषेविषयीं स्वतंत्र विचार करणें योग्य आहे. इतर

राहिलेल्या १०२ भाषा बोलणारे सारे शेंकडा ५ आहेत, तेव्हां त्या नांवाला आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

वर ज्या १२ भाषा सांगितल्या त्यांपैकीं हिंदीचा नंबर पहिला असून तिचा मुख्य प्रसार उत्तर हिंदुस्थानांत आहे. ही भाषा बरीच-फैलावली आहे. हिच्या खालोखाल बंगाली असून तिचा प्रसार मुख्यत्वें बंगाल व असाम ह्या दोन प्रांतांत आहे. इतर ठिकाणीं शेंकडा १$\frac{1}{2}$ ह्मणजे ह्मणण्यासारखा नाहीं. तेलगूचा नंबर तिसरा असून तिचा मुख्य प्रसार मद्रास व हैद्राबाद ह्या प्रांतांत आहे. तेलगूचाही प्रसार बराच झालेला आहे असें आढळतें. हिच्या खालोखाल मराठीचा प्रसार आहे. ही भाषा बोलणारे १,८९,००,००० लोक आहेत; परंतु मध्य हिंदुस्थानांतील संस्थानांचे भाषांची गणती झाली असती, तर मराठी बोलणारे सुमारें अधीक आहेत असें आढळून आलें असतें. मराठी बोलणारांपैकीं शेंकडा सुमारें ५६ मुंबई इलख्यांत, १८ निझामचे राज्यांत, १२ वऱ्हाडांत व ११ मध्य प्रांतात आहेत. हिंदीच्या खालोखाल बरीच फैलावलेली अशी ही भाषा आहे. पंजाबी बोलणारे १,७६,५५,००० असून त्यांपैकीं सुमारें शेंकडा ९९$\frac{1}{2}$ पंजाबांत आहेत. इतर ठिकाणीं ती नांवाला आहे. टामिल बोलणारे १,५२,३०,००० असून शेंकडा ९८ मद्रास इलख्यांत व १ ह्मैसूर प्रांतीं आहेत. गुजराथी बोलणारे १,०६,२०,००० आहेत व त्यांपैकीं शेंकडा ७७ मुंबई इलख्यांत, व २१ बडोदे प्रांतीं ह्मणजे वस्तुतः मुंबई इलख्यांत ९८ आहेत. कानडी बोलणारे ९७,५२,००० आहेत. त्यांपैकीं ह्मैसूर प्रांतीं शेंकडा ३७, मुंबई इलख्यांत ३१, मद्रास प्रांतीं १५ व निझामचे राज्यांत १५ आहेत. उरिय भाषेचा मुख्य प्रसार बंगाल्यांत असून तिचे खालोखाल मध्यप्रांत व मद्रास प्रांत ह्यांत आहे. मल्यालम बोलणारे ५४,२८,००० असून शेंकडा ९९ ह्मणजे बहुतेक मद्रास प्रांतांत आहेत. सिंधी बोलणारांपैकीं शेंकडा ९९ सिंध प्रांतांत

आहेत. उर्दूस स्वतंत्र भाषा समजतां येत नाहीं. तथापि, कित्येक कारणांस्तव तिजविषयीं विचार करणें जरूर आहे. उर्दू बोलणारे ३६,००,००० आहेत. त्यांपैकीं शेंकडा ३३ निझामचे राज्यांत, ३१ मुंबई प्रांत, २३ मद्रास प्रांत, ६ ह्मैसूरप्रांत, ४ मध्यप्रांत, २ बडोदे व २ कुर्ग ह्यांत आहेत. ह्याप्रमाणें हिंदी, बंगाली वगैरे १२ भाषांचा प्रसार आहे.

हिंदुस्थानांत एक भाषा करण्यास सुलभ पडावें ह्मणून वायव्यप्रांत, पंजाब, बंगाल, मध्यहिंदुस्थान, मुंबई, मध्यप्रांत, निझामचें राज्य व मद्रास असे ८ ग्रुप ( गट ) केले आहेत. ह्यांत भाषांचे संबंधानें खालीं लिहिल्याप्रमाणें स्थिति दृष्टीस पडते:—

ग्रुप नंबर १–वायव्यप्रांत–ह्यांत लहान मोठ्या भाषा २४, त्या बोलणारे ४,७७,००,०००; पैकीं हिंदी बोलणारे शेंकडा ९७; व इतर २३ भाषा बोलणारे सारे शेंकडा ३.

ग्रुप नंबर २–पंजाब–ह्यांत लहान मोठ्या भाषा २५; त्या बोलणारे २,५१,३०,०००; पैकीं पंजाबी व हिंदी बोलणारे शेंकडा ८०; व इतर २४ भाषा बोलणारे शेंकडा २०.

ग्रुप नंबर ३–बंगाल–ह्यांत लहान मोठ्या भाषा ६६; त्या बोलणारे ८,००,००,०००; पैकीं बंगाली, हिंदी व उरिया ह्या भाषा बोलणारे शेंकडा ९३; व इतर ६३ भाषा बोलणारे शेंकडा ७.

ग्रुप नंबर ४–मध्यहिंदुस्थान–जशी माहिती मिळावी तशी मिळाली नाहीं; यांत भाषा बोलणारांची संख्या २,२५,००,००० असावी. हिंदीचा विशेष भरणा असून तिचे खालोखाल मराठीचा असावा.

ग्रुप नंबर ५–मुंबई–ह्यांत लहान मोठ्या भाषा ३८; त्या बोलणारे २,९३,००,०००; पैकीं मराठी, गुजराथी, कानडी, व सिंधी बोलणारे शेंकडा ९१ व इतर ३४ भाषा बोलणारे शेंकडा ९.

...ग्रंथ संग्रहालय ... ठाणें.



ग्रुप नंबर ६–मध्यप्रांत–ह्यांत लहान मोठ्या भाषा ३६; त्या बोलणारे १,६८,४१,०००; पैकीं हिंदी, मराठी व उरिय बोलणारे शेंकडा ८६; व इतर ३३ भाषा बोलणारे शेंकडा १४.

ग्रुप नंबर ७–निजामचें राज्य–ह्यांत लहान मोठ्या भाषा २०; त्या बोलणारे १,१९,३७,०००; पैकीं तेलगू, मराठी, कानडी व उर्दू भाषा बोलणारे शेंकडा ९७ व बाकीच्या १६ भाषा बोलणारे सारे शेंकडा ३.

ग्रुप नंबर ८–मद्रास–ह्यांत ४१ भाषा आहेत; त्या बोलणारे ४,४४००,००० आहेत; पैकीं टामिल, तेलगू, मल्यालम व कानडी ह्या चार भाषा बोलणारे शेंकडा ९१ असून बाकीच्या ३७ भाषा बोलणारे शेंकडा ९ आहेत.

वर जो शेंकडा सांगितला तो ज्यांच्या त्या स्वभाषा आहेत त्यांचा आहे. ह्या भाषांचे द्वारें व्यवहार चालतो, तेव्हां त्या समजणारे आणखी जास्त असले पाहिजेत. तेव्हां वायव्यप्रांत ग्रुपमध्ये हिंदी, पंजाबांत पंजाबी व हिंदी, बंगाल्यांत बंगाली, हिंदी व उरिय, मध्य हिंदुस्थानांत हिंदी व मराठी, मुंबई प्रांतांत मराठी, गुजराथी, कानडी व सिंधी, मध्यप्रांतांत हिंदी मराठी व उरिय, निजामचे राज्यांत तेलगू, मराठी, कानडी व उर्दू, व मद्रास ग्रुपमध्यें टामिल, तेलगू, मल्यालम व कानडी ह्या मुख्य भाषा होत. व ह्या आठ निरनिराळ्या ग्रुपमध्यें एकभाषेविषयीं विचार करावयाचा ह्मणजे त्या त्या ग्रुपमध्यें ज्या मुख्य भाषा सांगितल्या त्या त्या विषयीं मुख्यत्वें विचार करावयाचा. कित्येक करणांकरितां मुंबई ग्रुपमध्यें मराठी, गुजराथी, कानडी व सिंधी ह्या भाषांशिवाय उर्दूचा, व मद्रास ग्रुपमध्यें टामिल, तेलगू, मल्यालम व कानडी ह्या चार भाषांशिवाय उरिय व उर्दू ह्यांविषयीं विचार करावा लागेल.